cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६१ | मंगळवार, दि.२४ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### देवा करो, ती योग्य वेळ लवकर येवो !

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल, असे आश्वासन माजी मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. या आश्वासनाबाबत महायुतीच्या जाहीरनाम्यातही उल्लेख होता. मात्र आता या सरकारला सहा महिन्यांचा काळ लोटला तरीही आश्वासनपूर्ती करता आलेली नाही. अजूनही शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आलेली नाही. कर्जमाफी मिळावी म्हणून शेतकरी संघटनांनी आंदोलने केली.

### पूजा खेडकरपाठोपाठ आणखी एक आयएएस अधिकारी अडचणीत

धाराशिव: पूजा खेडकरपाठोपाठ बनावट प्रमाणपत्र प्रकरणात आता राज्यातील आणखी एक आयएएस अधिकारी अडचणीत आला आहे. धाराशिवचे तत्कालीन जिल्हाधिकारी आणि सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांच्या ओबीसी नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्राची चौकशी होणार आहे. केंद्र सरकारने राज्याच्या मुख्य सचिवांना चौकशीचे आदेश दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सुभेदार यांच्या तक्रारीची दखल घेत हे आदेश देण्यात आले आहेत.

# डीएपी मिळत नसल्याने शेतकऱ्यांत नाराजी

## केवळ २५ टक्केच पुरवठा, शासनाने दिला पर्यायी खते वापरण्यांचा सल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

**खरीप हंगामातील पेरणीसाठी आवश्यक असलेल्या डीएपी खताची मागणीपेक्षा केवळ २५ टक्केच पुरवठा झाल्याने यंदा शासन यंत्रणेकडून शेतकऱ्यांना पर्यायी खतांद्वारे समाधान केले गेले. अजूनही या खताची टंचाई कायम असून, शेतकऱ्यांना संयुक्त खतांशिवाय पर्याय राहिलेला नाही.**




ऐन खरिपात डीएपी मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत आहे. पेरणीच्या आधीपासून दरवर्षी डीएपी खताचा साठा मोठ्या प्रमाणात असायचा. केवळ युरिया खताची टंचाई जाणवत होती. आता त्यात डीएपीची भर पडल्याचे चित्र राहिले. हरतऱ्हेच्या पिकासाठी पेरणीवेळी उपयुक्त खत म्हणून डीएपीची ओळख आहे. परंतु, यावर्षी मागणीपेक्षा केवळ २५ टक्के डीएपीचा पुरवठा झाला. कंपन्यांना केंद्र सरकारकडून अनुदानाची रक्कम न मिळाल्याने संबंधित कंपन्या खताचे उत्पादनच कमी केल्याची चर्चा आहे. डीएपीची यंदाच टंचाई जाणवण्यामागचे हे प्रमुख कारण असल्याचे सांगण्यात आले. यामुळे शासकीय यंत्रणेकडून पर्यायी

पान २ वर

### शासनाने तंबी देवूनही युरियासाठी लिंकिंग सुरूच

शेतकऱ्यांसह कृषी सेवा केंद्रचालकांकडून कितीही तक्रारी गेल्या तरीसुद्धा कंपन्यांकडून युरिया खतामागे देण्यात येणाऱ्या लिंकिंगची खते बंद झालेली नाहीत. लिंकिंगच्या खतविक्रीला दुकानदारांना जबाबदार धरण्यात येते. मात्र, मूळ युरिया उत्पादित कंपनीच दुकानदारांना युरियामागे लिंकिंग खते देत असेल तर विक्रेता काय करणार, हा प्रश्न आहे. लिंकिंग खतांची सक्ती न करण्याची सूचना कंपन्यांना का दिली जात नाही याचे कोडे आजपर्यंत उलगडलेले नाही. परिणामी युरियाला लिंकिंग सक्ती कायम राहिल्याने शेतकरी व दुकानदारही हैराण झाले आहेत.

## थोडक्यात...

### अबू आझमीला वादंग निर्माण करण्याची सवय आहे– प्रताप सरनाईक

मुंबई–नुकताच मंत्री प्रताप सरनाईक यांनी अबू आझमींवर जोरदार टीका केली आहे. 'या अबू आझमीला वादंग निर्माण करण्याची सवय आहे. आपली वोटबँक कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत' असे प्रताप सरनाईक म्हणाले.

### पुणे–सिंगापूर विमानसेवा १५ जुलैपर्यंत स्थगित

पुणे–एअर इंडियाच्या विमानांची तपासणी होणार असल्याने पुणे–सिंगापूर विमानसेवा १५ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी खबरदारी घेण्यात येत आहे. पुणे–सिंगापूर एअर इंडियाच्या ताफ्यातील बोईंग, इतर विमानांची तपासणी केली जाणार आहे.

### मराठी पण नष्ट करण्याचा प्रयत्न –संजय राऊत

मुंबई–महाराष्ट्र वरती हिंदीची सक्ती हा एक महाराष्ट्राला महाराष्ट्र वरचा मराठी पण नष्ट करण्याचा आहे हिंदीची सक्ती गुजरातला नाही किंबहुना अनेक वर्षांपूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी समोरच्या गुजराती जनतेला विचारला आहे तुम्ही हिंदीची सक्ती सहन करणार आहात का मोदींची वक्तव्य आहे का मग देवेंद्र फडणवीस हिंदीची सक्ती महाराष्ट्रावर का लादत आहेत, असा सवाल खासदार संजय राऊत यांनी केला

### कच्च्या तेलाच्या किमती वाढणार

नवी दिल्ली–पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र झाल्याने क्रूडच्या दरवाढीची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अमेरिका–इराण संघर्ष उफाळल्याने कच्च्या तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीला बंद करण्याचा इशारा दिला. परिणामी जगातील सुमारे २०% कच्चं तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक बंद होण्याची शक्यता आहे.

### शेतकऱ्यांनी कर्ज भरलेच पाहिजे–माणिकराव कोकाटे

अहिल्यानगर: महायुतीने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते परंतु शेतकऱ्यांनी कर्ज भरले पाहिजे, असे वक्तव्य कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. तसेच शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णयाचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा असल्याचेही कोकाटेंनी म्हटले आहे. अहिल्यानगरच्या कोपरगावात मीडियाशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

## शहरातील समस्यांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

### भुयारी गटार, नगर रोडचे डिव्हायडर, नळ कनेक्शन बाबत झाली चर्चा




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अनेक महत्त्वाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी (दि.२३) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक घेतली. या बैठकीत बीड शहरातील भुयारी गटार योजना, नगर रोडवर जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्यासाठी दुभाजक खुला करणे, नवीन अटल अमृत योजनेचे नळ कनेक्शन तसेच शहरात सुरू असलेली स्वच्छता मोहीम या महत्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीड शहरात भुयारी गटार योजना अर्धवट अवस्थेत बंद पडली आहे. ही बंद पडलेली कामे तातडीने पुनरुज्जिवीत करण्याची मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली. तसेच नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि न्यायालयात जाण्यासाठी नागरिकांना रस्ता दुभाजक

पान २ वर

# जून महिना संपत आला तरी लाडक्या बहिणी प्रतिक्षेत

## १२ व्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळणार?



**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जून महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा लाडक्या बहिणींना आहे. जून महिन्याचा हप्ता कधी मिळणार याकडे महिलांचे लक्ष लागले आहे.**

महाराष्ट्र सरकारच्या महिला व बालविकास विभागातर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली जाते. या योजनेच्या जून महिन्याच्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे. योजना सुरु केल्यानंतर साधारणपणे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यामध्ये १५०० रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात वर्ग केले जात होते. या योजनेद्वारे आतापर्यंत लाडक्या बहिणींना ११

पान २ वर

### या लाडक्या बहिणींना मिळतात ५०० रुपये

केंद्राचे ६००० रुपये आणि राज्याच्या योजनेचे ६००० रुपये म्हणजेच १२००० रुपये मिळतात. त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा १५०० रुपयांऐवजी ५०० रुपये दिले जातात. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अशा लाभार्थी महिलांची संख्या देखील लक्षणीय आहे. पीएम किसान आणि नमो शेतकरी योजनेच्या लाभार्थी महिलांची संख्या यापूर्वी जाहीर करण्यात आलेली असून ती ७७४१४८ इतकी आहे.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांस मारहाण:कारवाईसाठी रास्ता रोको

**पाटोदा । प्रतिनिधी**

महावितरण कार्यालयात घडलेली धक्कादायक घटना संपूर्ण शहराला हादरवणारी ठरली. एका कर्मचाऱ्यावर भरदिवसा कार्यालयात मारहाण करण्यात आली आणि त्यानंतर आरोपीनेच कार्यालयात घुसून मोठ्या प्रमाणात कार्यालयाची तोडफोड केली. मारहाण करणाऱ्यांस तात्काळ अटक करून त्याच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले.

प्राथमिक माहितीनुसार, बिलासंदर्भात सुरू

पान २ वर



## चोरीस गेलेले साडे दहा लाखाचे दागिने फिर्यादीस केले परत

**बीड । प्रतिनि**

**पोलीस ठाणे बीड शहर येथे चोरीचा गुन्हा दाखल झाला होता आणि त्यामध्ये डॉ. लक्ष्मीकांत तांदळे यांचे घरातून दागिने चोरी गेले होते.. बीड शहर पोलिसांकडून चोराचा शोध होऊन त्याला अटक करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २३ जून रोजी चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागिने मुद्देमाल हा मुळ मालकास परत करण्यात आला आहे. यावेळी डॉक्टर लक्ष्मीकांत तांदळे यांनी आभार व्यक्त केले .पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या या कार्यपद्धतीमुळे नागरिकांमध्ये विश्वास वाढीस लागला आहे. पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत,

पान २ वर



## सिरियातील अमेरिकेच्या लष्करी तळावर इराणचा हल्ला

### ३६ तासात घेतला बदला, युध्द आणखी भीषण होणार

**तेहरान । वृत्तसंस्था**

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आता इराणने ३६ तासांत बदला घेतला आहे. इराणने सीरियातील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ला केला आहे. यामुळे आता अमेरिका आक्रमण भुमिका घेऊन इराणवर हल्ले करण्याची शक्तता आहे.

पान २ वर

## वांगी शिवारात बिबट्याची दहशत

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील वांगी शिवारामध्ये बिबट्याची दहशत असून एका शेतकऱ्याच्या गाईच्या वासराचा बिबट्याने फरशा पडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.**

वांगी येथील शेतकरी महादेव शेळके यांच्या शेतामध्ये गाय आणि गाईचे वासरू होते. बिबट्याने गाईच्या वासरावर हल्ला केल्याने यात वासराचा मृत्यू झाला

पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.०० क्विंटल | १,८५५ | २,६७२ | २,४८३ |
| ज्वारी/हायब्रिड : ६९.०० क्विंटल | १,९०१ | ३,०५६ | २,४८१ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३९.०० क्विंटल | ६,२०० | ६,७४१ | ६,४९४ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: ८१.५० क्विंटल | १,९०० | २,८२२ | २,३५८ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४.५० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा:९.५० क्विंटल | ५,२०० | ६,७०० | ५,५५२ |

# एसटी महामंडळ दरवर्षी ५ हजार नव्या बस घेणार

## श्वेतपत्रिका जाहीर, ४५ वर्षात अवघ्या ८ वर्षात एसटी नफ्यात

**मुंबई । प्रतिनिधी**

**एसटी महामंडळाच्या शाश्वत प्रगतीसाठी श्वेतपत्रकात महसूल वाढवणे, खर्च कमी करणे व प्रवाशांच्या सुरक्षिततेसह सोयी–सुविधा वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच दरवर्षी ५ हजार नव्या बस घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ४५ वर्षात फक्त ८ वर्षात एसटीला नफा मिळाला असल्याचे समोर आले आहे.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपल्या आर्थिक संकटावर एक श्वेतपत्रक जाहीर केले असून, या श्वेतपत्रकात सध्याच्या आर्थिक स्थितीची स्पष्ट मांडणी करत संभाव्य उपाययोजनांची रूपरेषा दिली आहे. या दस्तऐवजानुसार, गेल्या ४५ आर्थिक वर्षांपैकी केवळ ८ वर्षांमध्येच महामंडळाने नफा मिळवला असून, उर्वरित वर्षांमध्ये सातत्याने तोटा झालेला आहे. हे श्वेतपत्रिका सर्वसामान्य नागरिक, शासन, कर्मचाऱ्यांसह इतर भागधारकांनाची आर्थिक स्थिती पारदर्शकपणे समजावून देण्याच्या हेतूने प्रसिद्ध करण्यात आले आहे. यात आगामी धोरण निर्णय, खर्चकपात योजना, तसेच महसूल वाढ व प्रवासी सेवांमध्ये सुधारणा करण्याचे नियोजन नमूद करण्यात आले आहे. महामंडळाच्या

पान २ वर



### ५३०० नव्या ईलेक्ट्रिक बसचा प्रस्ताव

श्वेतपत्रकात प्रवासी सुरक्षितता आणि सुविधा वाढवण्यासाठी ५,३०० इलेक्ट्रिक बस सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. योजना सवलतीच्या प्रवाशांसाठी लागू केली जाणार आहे. डिजिटल तिकिट प्रणालीद्वारे आणि प्रणालीचा वापर वाढवण्यात येणार आहे. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी प्रणाली बसवली जाणार आहे. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत.

### गेल्या चार वर्षात सरकारकडून एसटीला ९९२२ कोटी

२००१ ते २०२४ दरम्यान शासनाकडून ६,३५३.८० कोटीची भांडवली मदत मिळाली. कोविड काळात आणि संपाच्या पार्श्वभूमीवर ४,७०८.७३ कोटी अनुदान दिले गेले. गेल्या चार वर्षांत ९,९२२.७८ कोटींचे अनुदान मिळाले आहे.

cmyk

cmyk



## अग्रलेख

# देवा करो, ती योग्य वेळ लवकर येवो !

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल, असे आश्वासन माजी मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. या आश्वासनाबाबत महायुतीच्या जाहीरनाम्यातही उल्लेख होता. मात्र आता या सरकारला सहा महिन्यांचा काळ लोटला तरीही आश्वासनपूर्ती करता आलेली नाही. अजूनही शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आलेली नाही. कर्जमाफी मिळावी म्हणून शेतकरी संघटनांनी आंदोलने केली. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष, माजी आमदार बच्चू कडू यांनी अन्नत्यागही केला. पण सरकारकडून केवळ आम्ही कर्जमाफी देऊ असे सांगण्यात येते. कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सूचक विधान केले आहे. सरकार कर्जमाफीबाबत एकही शब्द फिरवणार नाही असे म्हटले आहे. सरकार एकही शब्द फिरवणार नाही असे ते म्हणत असले तरी शब्द फिरवला जाणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे अथवा पांढऱ्या दगडावरची काळी रेघ आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी योग दिनाच्या दिवशी पुण्यात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना शेतकरी कर्जमाफीबाबत विचारणा करण्यात आली तेव्हा फडणवीस म्हणाले, कर्जमाफी कधी करायची याचे काही नियम आणि पद्धत आहे. सर्व बाबी तपासून याबाबतचा निर्णय योग्य वेळी घेण्यात येईल. पण या कर्जमाफीबाबत सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरवणार नाही. योग्यवेळी हा निर्णयसुद्धा राज्य सरकार निश्चितपणे घेईल. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी प्रश्न विचारणाऱ्यांच्या, कर्जमाफीची आस बाळगून असणाऱ्यांच्या कोर्टात चेंडू टाकला आहे. उगीच काहीतरी विचारणाऱ्यांनी योग्य वेळ कधी येईल ते शोधत बसायचे. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची योग्य वेळ नेमकी कधी येणार आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कर्जमाफी कधी मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. देवा करो आणि ती योग्य वेळ लवकर येवो अशी म्हणण्याची वेळ आता आली आहे.

युक्रेन-रशिया युद्ध कधी संपणार, इस्रायल-इराण तणाव कधी निवळणार हे निश्चितपणे सांगता येते का? मग कर्जमाफीसंबंधीची योग्य वेळ कधी येईल हे निश्चितपणे सांगता येईल? तेव्हा अशा प्रकारचे भोळेभाबडे प्रश्न विचारून मुख्यमंत्र्यांचा लाख मोलाचा वेळ वाया घालवणे निश्चितच योग्य नाही. महिनाभरापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले? मी दिले आहे का? मी तरी दिलेले नाही, असे म्हणत हात वर केले होते. त्यामुळे मोठ्या वादाला तोंड फुटले होते. महायुती सरकारला कर्जमाफीबाबत निर्णय घ्यायचा आहे की नाही, असा प्रश्न शेतकरी संघटनांकडून विचारण्यात आला होता. शेतकरी कर्जमाफी देण्यात येणारच असे राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले होते. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून महायुतीमध्येच एकवाक्यता नसल्याचे दिसून आले होते.

राज्याची आर्थिक स्थिती पाहता किमान तीन वर्षे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे शक्य नाही, असे विधान काही महिन्यांपूर्वी अजित पवारांनी केले होते. पण आता पुन्हा मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्जमाफीसाठी सकारात्मकता दाखवल्याने शेतशिवारातील आशा-आकांक्षांना अंकुर फुटले आहेत. राज्यात महायुती सरकार आल्यापासून सुमारे दोन हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यापैकी बहुतेक आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे झाल्या आहेत. सत्तेवर येण्यासाठी महायुतीने निवडणुकीच्या तोंडावर कर्जमाफीची घोषणा केली होती. निवडणुकीच्या तोंडावर अशा घोषणा होतच असतात. लाडक्या बहिणींना निधी वाढवून देण्याची घोषणाही त्यापैकीच एक. प्रत्यक्षात काय घडले अथवा घडत आहे हा इतिहास ताजा आहे. आता मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, योग्य वेळी कर्जमाफी करू, ही योग्य वेळ कधी येणार? शेतकरी कर्जमाफीसंदर्भात सरकार संवेदनशील आहे. कर्जमाफी कधी करायची, या संदर्भात काही नियम आहेत. त्याची एक पद्धती आहे. योग्यवेळी हा निर्णय घेतला जाईल असे मुख्यमंत्री म्हणाले. राजकीय नेत्यांची आश्वासने 'गर्जेल तो पडेल काय' चालीवरची असतात. तोपर्यंत बळिराजाने आकाशाकडे डोळे लावून बसायचे. पण डोळे लावून लावून आता मिटायची वेळ आली, तरीही आश्वासनांचा पाऊस सुरूच आहे. लाडक्या बहिणींना वेळेवर पैसा देता येत नाही, त्यासाठी निधी पळवापळवीवरून लाथाळ्या त्यात कर्जमाफीसंबंधीची भर. एकूण काय, आनंदी आनंद!

# विद्यार्थ्यांकडून बोर्डेक्स पेस्टचे यशस्वी प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर


**बीड । प्रतिनिधी**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषि महाविद्यालय, बीड येथील कृषीदूतांनी मौजे खामगाव येथे ग्रामस्थांसाठी बोर्डेक्स पेस्ट प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन केले. या उपक्रमात कृषीदूतांनी गावकऱ्यांना बोर्डेक्स पेस्ट कसे तयार करावे, त्याचे फायदे आणि शेतीत त्याचा प्रभावी वापर कसा करावा, याची सविस्तर माहिती दिली.**



बोर्डेक्स पेस्ट हे पिकांसाठी एक महत्त्वाचे बुरशीनाशक असून, ते पिकांचे विविध रोगांपासून संरक्षण करून उत्पादन वाढीस हातभार लावते. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे हे पेस्ट तयार करण्याची पद्धत समजावून सांगितल्याने गावकऱ्यांनी त्यात विशेष रुची दाखवली. अनेक शेतकऱ्यांनी या प्रात्यक्षिकाचा उपयोग करून आपल्या शेतात बोर्डेक्स पेस्ट तयार करून वापरण्याची तयारी दर्शवली. यामुळे त्यांच्या कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले. हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरला असून, यामुळे त्यांचे शेतीतले ज्ञान अधिक प्रगल्भ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस.टी. शिंदे, उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. व्ही.राठोड सर आणी विशेषज्ञ डॉ पी. ए. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषीदूत आकाश जाधव, विश्वनाथ गायके, रोहन जावळे, गजानन घेणेकर , सय्यद झहीर, सानप गणेश उपस्थित होते. कृषीदूतांनी दाखवलेल्या या सक्रिय सहभागामुळे कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या योगदानाला प्रोत्साहन मिळाले आहे.

# घाटनांदुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बनले खाजगी वाहन गाड्यांच्या पार्किंगची अड्डा



**घाटनांदुर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील व परळी मतदारसंघातील सर्वात मोठी असलेली बाजारपेठ म्हणजे घाटनांदुर या ठिकाणी २० ते २५ गावातील नागरिकांची हजारोच्या संख्येने दररोज य-जा होते तसेच घाटनांदुर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे दररोज रुग्णांचीही संख्या य -जा मोठ्या संख्येने होत असल्यामुळे इमर्जन्सी रुग्णांना ये जा करण्यासाठी खाजगी वाहने रस्त्यात लावत असल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राचा पार्किंगचा अड्डा बनला आहे यामुळे इमर्जन्सी रुग्णांना अडथळा निर्माण झाला आहे या सर्व बाबत स्थानिक व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे घाटनांदुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे खाजगी वाहनांचा पार्किंगचा अड्डा बनला आहे व तसेच येथील डॉक्टरांच्या मनमानी कारभारामुळे वेळेवर येत नसल्यामुळे घाटनांदुर व परिसरातील २० ते २५ गावातील रुग्णांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेळोवेळी डॉक्टर व कर्मचारी वेळेवर येत नसल्यामुळे याची कल्पना देऊनही वरिष्ठ अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करत असताना दिसत आहेत या सर्व बाबत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी लक्ष देण्याची गरज आहे अन्यथा घाटनांदुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची शोभेची वस्तू बनवल्याशिवाय स्थानिक व वरिष्ठ अधिकारी करतील असे संतप्त सुर घाटनांदुर व परिसरातील नागरिकातून येत आहेत.

# शेतकऱ्यांना पिककर्ज वसुलीसाठी बंकांकडून नोटिसा

## शेतकरी आर्थिक संकटात आसताना बँकांचे हे वर्तन अशोभनिय

**सारणी । प्रतिनिधी**

**शेतकरी आर्थिक विवंचनेत आसताना पिककर्ज असलेल्या शेतकऱ्यांना बकाकडून वसुली संदर्भात नोटिसा पाठवल्या जात आहे. यामुळे शेतकरी माणसिक त्रासाला सामोरे जात आहे. या बकाच्या दंडुकेशाही प्रकारामुळे शेतकर्यांध्ये तिव्र असंतोष पहावयास मिळत आहे.**

पेरणीच्या तोंडावर बँकांकडून शेतकऱ्यांना पीक कर्ज वसुलीसाठी नोटीसा पाठवल्या जात आहेत. त्यामुळे या बँकांना शेतकऱ्यांविषयी काहीच देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. शेतकऱ्यांची आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी बँकांनी उपाय योजना राबवणे गरजेचे असताना आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांना बँका नोटीसा पाठवून कायद्याचा फास त्यांच्या गळ्याभोवती आवळण्याचा प्रयत्न करत आहेत. कृषीप्रधान प्रधान भारत देश म्हणून संपुर्ण जगामध्ये आपली प्रतिमा तयार केली असली तरी प्रत्यक्ष मात्र या भारत देशामध्ये शेतकऱ्यांचा भक्ष्य म्हणून येथील सरकार आणि प्रशासकीय यंत्रणा वापर करत असल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्यामुळेच की काय पेरणीच्या तोंडावर शेतकरी आर्थिक विवंचनेमध्ये असतो याचाच फायदा घेत पीक कर्ज असलेल्या बहुतांश नव्हे संपूर्ण शेतकऱ्यांना बँकांकडून कायद्याचा भडगाव उभारत नोटीसा पाठवले आहेत त्यामुळे अशा बँकांना सरकारनेच अशी कारवाई करण्यास भाग पाड आहे का असा प्रश्न आता शेतकऱ्यांमध्ये उपस्थित झालेला दिसून येत आहे कारण सरकारच्या बोलण्यात आणि कृतीत जमीन आसमान चा फरक पहावयास मिळत आहे निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करू असे जाहीर वचन सरकारमधील मंत्र्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी जनतेला दिले असताना याचा मात्र त्यांना आता विसर पडला आहे की काय असाच प्रश्न होता शेतकऱ्यांसमोर आहे. बँकांच्या अशा या दंडुकीशाहीच्या वर्तनामुळे शेतकरी मानसिक त्रासाला सामोरे जाऊन पुढे शेतकऱ्यांना बँका आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात असेच म्हणावे लागेल त्यामुळे सरकारने वेळीच अशा बँकांना सरकारने वेळीच लगाम घालणे गरजेचे आहे. नसता सरकार विरोधी शेतकरी वर्गातून मोठे जनआंदोलन उभारले जाऊ शकते. ऐवढा त्रास बँका शेतकऱ्यांना देऊ लागल्या आहेत. निवडणुकीत कर्जमाफीचे आश्वासन देऊन सत्ता मिळवणारे महायुतीचे नेते आता शेतकऱ्यांना कर्ज वसुलीसाठी नोटीस येत असताना गप्प का? बच्चू कडू यांचे आंदोलन थांबावे म्हणून कर्ज वसुली बंद करण्याचे दिलेले आश्वासन देखील तकलादू होते का? खोट्या आश्वासनांच्या पायावर उभी महायुतीची सत्ता शेतकऱ्यांच्या हितासाठी नाही हेच दिसत असून सरकारने सक्तीने केली जाणारी कर्जवसुली थांबवायला हवी.




**दिंद्रुड : टकारवाडी येथील रेशीम शेती उद्योजक छाया शिवराज फाटे यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नवकल्पनाची अंमलबजावणी, शाश्वत व पर्यावरण पूरक शेतीचा अवलंब व शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य याबाबत राष्ट्रऋषी नानाजी देशमुख आदर्श शेतकरी पुरस्काराने दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र,अंबाजोगाई च्या वतीने सोमवारी सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी राज्यसभा सदस्य खा.अजित गोपछडे यांचे प्रमुख उपस्थिती होती.**

# भारतीय स्टेट बँक शाखा माजलगाव यांनी काढलेल्या जमीन विक्री लिलावास न्यायालयाकडून स्थगिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतीय स्टेट बँक माजलगाव यांनी काढलेल्या जमिनी विक्री लिलावास माजलगाव दुसरे सह दिवाणी न्यायाधीश यांनी पुढील आदेशापर्यत तुर्तातुर्त मनाई आदेश दिला आहे.**

माजलगाव येथील भारतीय स्टेट बँक यांनी दिनांक २९ मे २०२५ रोजी ई-लिलाब नोटीस प्रकाशीत करुन मे राधे राधे कॉट स्पिनींग प्रो. प्रा.राधेश्याम रामेश्वर दायमा यांनी कर्जास गाहन ठेवलेली मौजे धनगरवाडी ता. माजलगाव जि.बीड येथील गट क्र.६१ मधील ०० हे. ८१ आर जमीन सदर कर्जाची कसलीही माहिती न देता अभिनंदन दुगड यांनी सन २०२३ साली खरेदीखताद्वारे विक्री करुन प्रत्यक्ष ताब्यात दिली व पुढे ती अभिनंदन दुगड यांनी शहा मोसीन नयुम शहा,नय्युम शहा हाजी पाशा शहा व मोहम्मद अकबर अब्दुल मज्जीद कच्छी यांना खरेदीखताने विक्री करुन मालकी हक्काने प्रत्यक्ष ताब्यात दिली होती व त्यांनी सदरची मालमत्ता अकृषी परवानगी मोजणी व ईतर परवानगी अंती प्लॉटींग उपयुक्त बनवलेली आहे. परंतु सदरची मालमत्ता पुर्वीचा मुळ मालक दायमा यांनी बँकेकडे गाहन ठेवलेली असल्याने व कर्जाची परत फेड कर्जदार दायमा व जामीनदार यांनी परत फेड न केलेने ती मालमत्ता बँकेने विक्री कारणेसाठी ई-लिलाव नोटीस प्रकाशीत केल्यानंतर शहा मोसीन नयुम शहा, नय्युम शहा हाजी पाशा शहा व मोहम्मद अकबर अब्दुल मज्जीद कच्छी यांनी ते नमुद मालमत्तेचे प्रमाणीक खरेदीदार आहेत,बँकेकडे कर्जदार व जामीनदार यांचे ईतर मालमत्ता लिलाव काढणेकरिता उपलब्ध आहेत,मा. जिल्हादंदाधिकारी यांनी बँकेस सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिलेला नाही या व ईतर मुद्यावर सदर मालमत्तेचे ई-लिलाब विक्री प्रक्रियाला दिवाणी न्यायालय माजलगाव येथे दावा दाखल करुन अंतरीम मनाई आदेशाची मागणी केली होती.सदर प्रकरणाची सुनावणी माजलगाव येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश जी.एस. खुपसे यांचेसमोर झाली असता न्यायालयाने दिनांक २० जुन २०२५ रोजी पुढील आदेशापर्यंत मौजे धनगरवाडी ता. माजलगाव जि. बीड येथील गट क्र. ६१ मधील ०० हे. ८१ आर जमीन विक्री लिलावास अंतरीम तुर्तातुर्त मनाई आदेश दिला आहे. सदर प्रकरणात ॲड. शरद एस. सोळंके यांचे मार्गदर्शनात ॲड.व्हि.बी. कदम यांनी युक्तीवाद केला.

## पान १ वरून...

### डीएपी मिळत नसल्याने

खतांचे अस्त्र बाहेर काढण्यात आले. डीएपीपेक्षा संयुक्त खते किती उपयुक्त आहेत याचे प्रबोधनही यंत्रणेने गावागावांतून केले. शेतकऱ्यांनी नाईलाजाने संयुक्त खताचा वापर केला. परंतु, डीएपी टंचाईची नामुष्की टाळण्यासाठी प्रबोधनाच्या माध्यमातून केलेला हा प्रयत्नच असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. डीएपी टंचाईवर मात करण्यासाठी त्याला पर्यायी सिंगल सुपर फॉस्फेटसह १०२६२६::, १२३२१६::, १५१५१५::, २०२००१३:: अशी खते वापरण्याचा सल्ला दिला गेला. परंतु, डीएपी नसल्याची खंत अजूनही जाणवत आहे.

-------------

### जून महिना संपत आला तरी

हप्त्यांची रक्कम देण्यात आलेली आहे. आता जून महिन्याच्या हप्त्याचे १५०० रुपये कधी मिळतात याची लाडक्या बहिणींना प्रतीक्षा आहे. राज्याच्या महिला व बाल विकास विभागाकडून जून महिन्याच्या हप्त्यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

------------

### शहरातील समस्यांवर आ.संदीप क्षीरसागरांनी

खुला करण्याची गरज व्यक्त केली. यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी होईल, असे मत आ. क्षीरसागर यांनी मांडले.याशिवाय, अमृत अटल जल योजनेंतर्गत नव्याने सुरू करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे अनेक नागरिकांना अद्याप कनेक्शन मिळालेले नाहीत. ही कनेक्शन तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी सूचना बैठकीत करण्यात आली. यासोबतच, बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेला प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त करत, यंत्रणांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन आ. क्षीरसागर यांनी केले. दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह बीड नगरपरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि इतर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

------------

### चोरीस गेलेले साडे दहा लाखाचे

अपर पोलीस अधीक्षक श्री सचीन पांडकर, शितलकुमार बल्लाळ, सहा.पोलीस निरीक्षक-बाबा राठोड व पोलिस अंमलदार बालाजी मुळे यांचे उपस्थितीत सोन्याचे दागिने फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात आले.

---------------

### महाविरणच्या कर्मचाऱ्यांस

असलेल्या वादातून एका गुत्तेदाराने महावितरण कर्मचाऱ्याशी वाद घालून त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. यानंतर संबंधित गुत्तेदाराने संतापाच्या भरात कार्यालयातील फर्निचर, संगणक, फायली व अन्य कागदपत्रांची नासधूस केली. या तोडफोडीत महावितरणच्या शासकीय संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कार्यालयात काही काळ कामकाज ठप्प झाले. मारहाण झालेल्या कर्मचाऱ्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पाटोदा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. महावितरणच्या कर्मचाऱ्यांस मारहाण करून कार्यालयाची तोडफोड करणाऱ्या गुंत्तेदारावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले.

-------------

### वांगी शिवारात बिबट्याची

आहे. शेतकरी त्या ठिकाणी धावल्याने बिबट्याने तेथून पळ काढला. मात्र वांगी शिवारात बिबट्या आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा तात्काळ वन विभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

-------------

### सिरियातील अमेरिकेच्या लष्करी

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आता इराणने ३६ तासांत बदला घेतला आहे. इराणने सीरियातील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ला केला आहे. सोमवारी इराणी माध्यमांनी सीरियातील अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ला झाल्याची माहिती दिली. अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्याच्या ३६ तासांनंतर सीरियातील अमेरिकेच्या तळावर हा हल्ला करण्यात आला आहे. त्यामुळे अमेरिकेला मोठा धक्का बसला आहे.

मेहर न्यूजने सूत्रांचा हवाला देत म्हटले आहे की, इराणने सीरियाच्या पश्चिम हसाका प्रांतातील अमेरिकेच्या लष्करी तळाला लक्ष्य केले आहे. सूत्रांनी सांगितले की या हल्ल्यानंतर लष्करी तळाच्या मुख्य प्रवेशद्वारावर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. इराणने हा हल्ला मोर्टारने केला असल्याचीही माहिती समोर आली आहे.

**१९ आखाती देशांमध्ये अमेरिकेचे तळ**

समोर आलेल्या माहितीनुसार १९ आखाती देशांमध्ये अमेरिकेचे तळ आहेत. अमेरिकेने सीरिया, कतारसारख्या देशांमध्ये मोठे तळ बांधलेले आहेत. मध्य पूर्वेत ५० हजार अमेरिकन सैनिक तैनात आहेत. मात्र आता इराणवर हल्ला केल्याने अमेरिकेच्या या तळांना धोका वाढला आहे. न्यू यॉर्क टाईम्सच्या मते इराणच्या निशाण्यावर तुर्की, सीरिया, कतार, सौदी, जॉर्डनचे तळ आहेत. यातील काही तळांवर इराण आणखी मोठा हल्ला करण्याची शक्यता आहे.

**इराणच्या बाजूने येमेन देशाची युध्दात उडी**

इराण-इस्त्राईल युद्धात आता येमेन हा देशही अधिकृतरीत्या सहभागी झाला आहे. ब्रिगेडियर जनरल याह्या सरीअ यांनीच तशी माहिती दिली आहे. येमेन हा देश आता अधिकृतरित्या अमेरिका आणि इस्त्रायल यांच्याविरोधातील युद्धात सामील झाला आहे.

------------

### एसटी महामंडळ दरवर्षी

शाश्वत प्रगतीसाठी श्वेतपत्रकात महसूल वाढवणे, खर्च कमी करणे व प्रवाशांच्या सुरक्षिततेसह सोयी-सुविधा वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. श्वेतपत्रकानुसार, महसूल वाढवण्यासाठी दरवर्षी ५,००० नवीन बस आपल्या ताफ्यात समाविष्ट करणार आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडे तत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खाजगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत.

-------------

## मार्कशीट हरवले आहे

धनश्री सोमनाथ खटाळ या विद्यार्थिनीचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे सन २०२२ इयत्ता दहावी उत्तीर्ण मार्कशीट व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे सन २०२४ चे इयत्ता बारावी उत्तीर्ण मार्कशीट दिंद्रुड ते माजलगाव प्रवासादरम्यान हरवले आहेत सापडल्यास ९४२१२७३०४० या क्रमांकावर कृपया संपर्क साधावा.

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. २४ जून २०२५
३

# माळेगाव शिवारात गांजा पकडला

बीड । प्रतिनिधी

२३ जून रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मौजे माळेगाव गावाचे शिवारात सिध्देश्वर ठोंबरे नामक व्यक्तीने त्याचे शेतात गांजाची झाडे जोपासली असलेबाबत प्राप्त माहितीनुसार आजरोजी छापा घातला असता सिध्देश्वर भिसे नामक व्यक्तीचे शेतात ३,९४,०००/- रू. किंमतीची १९.७ कि. ग्रॅम वजनाची गांजाची झाडे मिळून आली. सदरचा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून संबंधिताविरूध्द गुन्हा दाखल करण्याची



प्रक्रिया चालू आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक कमललेश यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती पूजा मॅडम, परि. पोलीस उपअधिक्षक, सपोनि मच्छिंद्रनाथ, प्रभारी अधिकारी, युसफ वडगाव पोलीस ठाणे, पोहवा/९९६ बालासाहेब, पोहवा/१२९१ सीताराम, पोहवा/१५३१ संपत, पोना/१८३७ दिलीप, पोना/१०३५ अनिल, पोना/१८६० राजू यांनी केली.

# स्मार्ट शिक्षणातून घडतील गुणवंत विद्यार्थी -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महात्मा फुले स्मारक समिती, माळी नगर अंबाजोगाई येथे नुकतेच नेटीझंस प्री.प्रायमरी स्कूलचे उद्धाटन अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विचारमंचावर डायटचे प्राचार्य योगेश सुरवसे, खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.विभीषण फड, माजी मुख्याध्यापक लंकेश वैद्य, पांडुरंग ढगे, इंगळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.राजेश इंगोले व इतर मान्यवरांच्या हस्ते उदघाटन फित कापून आणि महापुरूषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शिक्षण हे केवळ पुस्तकातून वाक्य बोलून शिकविल्याने आत्मसात होत नाही तर त्याला अनुभव समृद्धीची जोड दिल्यास शिक्षण हे खऱ्या अर्थाने आपल्या जीवनामध्ये वापरता येऊ शकते. आणि असे शिक्षण घेतलेली पिढी खऱ्या अर्थाने संशोधक किंवा नवनिर्माते होऊ शकतात. नेटीझन्स प्री-प्रायमरी स्कूल मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लहान मुलांच्या बुद्धिमत्तेला विकसित करण्यासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्या ज्ञानाला आवश्यक असे अनुभव समृद्ध शिक्षण देण्याचा अभिनव प्रयत्न प्राचार्य.डॉ मिलिंद ढगे प्रथमच अंबानगरीमध्ये करीत आहेत. हा वेगळा मार्ग चोखाळलेले ढगे हे निश्चितच शिक्षण क्षेत्रात या आपल्या आगळ्यावेगळ्या मार्गाने एक नवीन संशोधक पिढी घडवतील असा विश्वास आहे.या शाळेमधील शिक्षण घेतलेले विद्यार्थी निश्चितपणे आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग समाज हितासाठी नवीन संशोधन, नवीन संकल्पना निर्मिती करून करतील यात शंका नाही. बाल वय हे आजूबाजूचे निरीक्षण करून ज्ञान आत्मसात करत असते. या वयात जर विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या मनोरंजनात्मक प्रयोगांमधून ज्ञान देण्याचा प्रयत्न केला. तर त्यांची बुद्धिमत्ता विविध अंगांनी वाढण्याचा संभव वाढतो. त्यांची निरीक्षण क्षमता, निर्णय क्षमता आपोआप वाढते. मेंदूला प्रयोगांती मिळालेले निष्कर्ष मुलांच्या मेंदूत दीर्घकाळ लक्षात राहतो. यातून विद्यार्थ्यांच्या संशोधक बुद्धीला वाव मिळतो. एकाच गोष्टीवर विविध पद्धतीने विचार करण्याची मेंदूची क्षमता वाढते. हे अनुभव समृद्ध शिक्षण विद्यार्थ्याला अष्टपैलू बनवते त्यामुळे नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूल निश्चितपणे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवून आणेल यात शंका नाही असे गौरवोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी उद्घाटनपर मनोगत केले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी शाळेमध्ये शिक्षक - विद्यार्थ्यांचे नाते घरी पालक आणि पाल्याचे नाते कसे असावे यावर प्रकाशझोत टाकत शिक्षक आणि पालकांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. शिक्षण घेत असताना शाळेत तसेच घरी सकारात्मक वातावरण कसे निर्माण करायचे, बालसंस्कार पालकांनी शिक्षकांनी आपल्या कृतीतून कसे द्यावे यावर मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य योगेश सुरवसे यांनी बोलताना नेटीझंस प्री-प्रायमरी स्कूलने हा अभिनव प्रयोगशील उपक्रम केला याबद्दल त्यांचे कौतुक केले. हा प्रयोग करत असताना समाजातील वंचित, गरजू घटकांना या शिक्षण प्रवाहात सामावून घेण्याचे आवाहन करीत शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना उपप्राचार्य विभीषण फड यांनी प्रा.मिलिंद ढगे हे एक अजब रसायन आहे. विविध शैक्षणिक प्रयोग करणे, सामाजिक प्रयोग करणे हा त्यांचा छंद आहे आणि त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांमध्ये त्यांना निश्चितपणे आतापर्यंत यश आलेले आहे. नेटिजन्स प्री-प्रायमरी स्कूल ही अशाच उपक्रमशील प्रयोगांची शाळा व्हावी आणि भविष्यामध्ये हा प्रयोग निश्चितपणे यशस्वी होणार आहे असे सूतोवाच केले. प्रास्ताविक करताना प्रा.मिलिंद ढगे यांनी नेटिझन्स प्री प्रायमरी नॅशनल स्कूल ही अनुभव समृद्ध शिक्षणाची प्रयोगशाळा होणार आहे. इथे शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञानाच्या अनुभवासोबतच प्रयोगाचे अनुभव ही घेणार आहे. मेंदू हा वेगवेगळ्या प्रकारच्या पंचेंद्रिया द्वारे अनुभव घेत, त्या परिस्थितीची स्मृती निर्माण करून या स्मृतीचा भविष्यात आपल्या जीवनात उपयोग करत असतो.जपानमध्ये मुलांची बुद्धिमत्ता विकसित करण्यासाठी याच प्रकारच्या तत्वाचा उपयोग केला जातो. हेच हेरून या नेटिझन्स प्रीप्रायमरी नॅशनल स्कुलमध्ये स्मार्ट स्क्रीन, स्मार्ट वैज्ञानिक खेळणी, स्मार्ट खेळ आणि सोप्या भाषेत अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. त्यामुळे इथं शिकणारा प्रत्येक विद्यार्थी हा निश्चितपणे स्मार्ट विद्यार्थी बनणार आहे असे आश्वासन उपस्थित पालकांना दिले. हे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञान असणार नाही. तर त्याला विविध उपक्रम आणि प्रयोगाची जोड दिल्याने ते शिक्षण या विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये कायमस्वरूपी स्मरणात राहणार आहे आणि या अनुभवानी ते भविष्यामध्ये विविध प्रयोग करून ते काम करत असलेल्या प्रत्येक क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडून आणतील असा विश्वास मिलिंद ढगे यांनी यावेळी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना पांडुरंग ढगे यांनी विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक करतो. शिक्षणाचा उद्देश ज्ञान प्राप्ती करणे आणि त्या ज्ञानाचा समाजाच्या उन्नतीसाठी उपयोग करणे हा असतो असे सांगितले. यावेळी माजी मुख्याध्यापक लंकेश वैद्य, इंगळे सर यांनीही समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा होके यांनी केले. तर उपस्थितांचे आभार माधव घाडगे यांनी मानले. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी, संचालिका श्रद्धा ढगे, रत्नदीप गोरे, डॉ.किरण चक्रे यांच्यासह शाळेच्या शिक्षक आणि कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले.



नेटीझन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूलचे उद्घाटन

## पान ६ वरून...

### योग हा सुखी व समृद्ध

व सांधे मजबूत होतात. संधिवातासारखे आजारसुद्धा कमी होऊन शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते.त्याचबरोबर प्राणायाम व ध्यान केल्यामुळे श्वसन संस्था याचे कार्य सुधारून हृदय सुद्धा निरोगी राहते असे डॉ ज्ञानोबा दराडे यांनी याप्रसंगी सांगितले.आजच्या धकाधकीच्या आयुष्यामध्ये ताण तणाव रोजच वाढत आहेत. अगदी छोट्या छोट्या कारणामुळे मारहाण, आत्महत्या यासारख्या घटना घडत आहेत.मात्र योग व प्राणायाम केल्यामुळे मन संतुलित होऊन मनाची व मेंदूची कार्य क्षमता वाढते .बुद्धी कुशाग्र होते व एकंदरीत विचारसरणी सकारात्मक बनते. त्यामुळेच योग हा सुखी, समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग असच्याचे परखड मत डॉ ज्ञानोबा दराडे यांनी या योगशिबिर प्रसंगी व्यक्त केले. त्यांनी वृक्षासन, ताडासन , भुजंगासन, धनुरासन , त्रिकोनासन शशांसन, उष्ट्रासन, चक्रासन आदी योगासनांचे प्रशिक्षण उपस्थित सर्वांना दिले. प्रत्येकाने शारीरिक मानसिक व सामाजिक आरोग्य चांगले राहावे यासाठी दररोज किमान ४५ मिनिटे योग अभ्यास तथा योगसाधना करण्याचे अवाहन डॉ दराडे तसेच अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी उपस्थितांना केले.

### विठू नामाच्या गजरात

म.पांचाळ, मृंदगाचार्य गणेश म.टाले,शिवम म.थोरात,हभप बळीराम पास्टे, हरिभाऊ गोले, काशीनाथ किनोळकर, उर्मिलाताई मनसुके, शेषेराव किनोळकर,वसंत बल्लाळे, बापुराव गोंडे,काशीनाथ खेत्री, सखाराम पास्टे, माऊली पास्टे,अंगद पास्टे,विश्वनाथ इके, अशोक सुरवसे,शिवाजी खेत्री, दत्तात्रय खेत्री,आत्मभाऊ पास्टे, विश्वनाथ नावडकर,रामदास शिवलींगे यांच्यासह परिसरातील शेकडो वारकरी सहभागी झाले आहेत.

### अभिषेक चावला यांचा

ऑफ फिजिक्स टीचर्स. अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण आष्टी व दिल्ली आणि बी. पी. एच. ई. सोसायटी जूनियर कॉलेज अहिल्यानगर येथे झाले कारुण्या यूनिवर्सिटी कोयम्बतूर तमिलनाडु येथे कंप्यूटर साइंसिस एंड इंजीनियरिंग ( . ) प्रथम श्रेणीतुन डिग्री प्राप्त केली. माइक्रोसॉफ्ट,अज़ूर, साइबर सिक्युरिटी, गुगल, हॉन्गकॉन्ग यूनिवर्सिटी, सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये अनेक वर्कशॉप केले आहेत. अभिषेकच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### वंजारी समाज बांधवांचा

माऊली शिरसाठ यांचा तेलंगाना राज्यातील समाज बांधवांच्या वतीने भव्य विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी तेलंगणा वंजारी समाज प्रमुख श्रीयुत रामोजी यांच्यासह जेष्ठ मान्यवरांची उपस्थिती होती.दरम्यान, ''आम्ही समाजाच्या अन्याविरुद्ध अत्याचाराविरुद्? उठवत असलेला आवाज.. समाजासाठी सातत्याने छोटं मोठं करत असलेले काम.. याची दखल घेऊन तेलंगणा राज्यामध्ये वंजारी समाज बांधवांच्या मेळाव्यामध्ये मोहन आघाव सर व समाजसेवक माऊली शिरसाट यांचा भगवान बाबाची प्रतिमा व मुंडे साहेबाची मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला! ही केवळ आमच्या कर्तव्य भावनेची पावती आहे!!'' अशी प्रांजळ भावना यावेळी सामाजिक कार्यकर्ते माऊली शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.या वंजारी समाज बांधवांच्या मेळाव्याला तेलंगणाचे आमदार व्यंकटराव , माजी केंद्रीय मंत्री भागवतराव कराड , प्रा.सुशीला ताई मोराळे, माजी आमदार , गोविंद अण्णा केंद्रे , माजी आमदार संजय भाऊ दौंड , माजी आमदार नारायणराव मुंडे , माजी आमदार तोताराम कायंदे, वंजारी सेवा संघाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष राहुलजी जाधवर अन्य मान्यवराच्या हस्ते समाज बांधवांचाही सन्मान करण्यात आला.तेलंगाना राज्यामध्ये वंजारा समाज बांधवांच्या वतीने अत्यंत देखणा सोहळा समाज बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पाडला. येथील वंजारी भवन खरंच पाहण्याजोगा आहे. आणि आपल्याकडे देखील मुंबईसारख्या ठिकाणी एक चांगलं वंजारी भवन व्हावं! असा आपण सर्वजण प्रयत्न करूया.. अशी अपेक्षा यावेळी बीड जिल्हा वंजारी भूमिपुत्रांच्या वतीने व्यक्त करण्यात आली. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातही हिंदुस्तानच्या राष्ट्रीय कार्यात अल्पसंख्यांक असलेल्या वंजारी समाज बांधवांचे मोठे योगदान राहिले आहे. इतिहासामध्ये याचा उल्लेख असून वंजारी समाज बांधवांच्या त्याग, निष्ठा, कष्टाळूपणा मेहनत आणि धाडसी या गुणांचा सातत्याने फायदा होत राहिला आहे. दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात राहणारा आणि अल्प शेतीवर गुजराण करणारा असा इतिहास असलेल्या वंजारी समाजाला संत भगवानबाबा, संत वामनभाऊ महाराज तसेच राजकीय क्षेत्रात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम प्रेरणेचा वारसा मिळाला आहे. समता बंधुत्व ऐक्य या मूल्यांबरोबरच शिक्षणातून मानवी समाज भावनेच्या उत्कर्षासाठी आपण सर्वांना सोबत घेऊन पुढे जाऊ.. असा विश्वास या मेळाव्याच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.

### अवैधरित्या वाळुची चोरटी

अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा. पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे, संदिप राठोड, पोलीस अंमलदार अमोल कदम, शिवगणेश मिरकले यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन भव्यदिव्य स्वरूपात संपन्न

घाटनांदुर । प्रतिनिधी

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन च्या मान्यतेने व बीड जिल्हा तलवारबाजी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ जून २०२५ रोजी १७ वी मिनी व ५ वी चाइल्ड जिल्हास्तरीय फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन तालुका क्रीडा संकुलन अंबाजोगाई येथे थाटामाटात संपन्न झाले. या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी युवा नेते अक्षय भैया मुंदडा, वैजनाथ भैया देशमुख , दत्ता देवकत,पत्रकार परमेश्वर वैद्य, आकाश बनसुडे, लक्ष्मण जाधव, स्वप्ना शिराळे ,पिराजी कुसळे बीड जिल्हा तलवारबाजी संघटना सचिव इ. मान्यवर मंचावर उपस्थित होते.




या कार्यक्रमाच्या उद्घाटनिय भाषणात अक्षय भैया यांनी तलवारबाजी खेळाचे नियमाचे पालन करून खेळाडूंनी खेळाडू वृत्तीने सामने खेळावे,अंबाजोगाई तालुक्यांमध्ये तलवारबाजी स्पर्धा होत आहे ही गौरवास्पद बाब आहे. असे सांगून खेळाडूंना या स्पर्धेत चांगल्या प्रकारे आपला कला गुण दाखवावा असे मत व्यक्त केले. ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी बीड जिल्हा तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष गोविंद भैया देशमुख, महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे सहसचिव प्रा.डॉ पांडुरंग रणमाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेमध्ये पंच म्हणून लाभलेले आकाश बनसुडे एन आय एस कोच पटियाला यांनी काम पाहिले.तर कार्यक्रमाचा समारोप पिराजी कुसळे यांनी केला.जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातून ३७ खेळाडूंनी सहभाग घेतला.खेळाडू, संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक, आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वैष्णवी जाधव,अंकुश गायकवाड, शिवकुमार मुरुडकर, सुजाता गाढवे, श्रेयश गायके, ओम बडे, कल्पेश जाधव, नैतिक ढेंबरे, रणवीर सोळंके यांनी परिश्रम घेतले.

# एप्रिलपासून पगार न दिल्यामुळे कंत्राटी कामगारांवर आली उपासमारीची वेळ

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**संपूर्ण जिल्ह्यात महावितरण चा कणा असलेले वाहास्रोत कंत्राटी कामगाराची संख्या ही मोठी असून यांच्या कार्यकाळ ३१ मार्च रोजी संपुष्टात आला होतो. १ एप्रिलपासून नवीन कंत्राटी कामगार ठेकेदार यांची नियुक्ती होऊनही आष्टी तालुक्यातील कंत्राटी कामगार यांना अडीच महिन्याचा कालावधी उलटूनही आता पर्यंत कंत्राटी कामगार कामावर किती आहे, आणि कुठं व कोणते काम करीत आहे यांची माहिती मिळणे काढीनच आहे. तर जिल्ह्यात नवीन कंत्राटी कामगार यांना रुजू करताना कोणतीही कागदपत्राची शहानिशा न करता विना अनुभव यांना सरळ नियुक्ती देऊन स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतर कामगाराच्या जीवाशी खेळण्यासाठी सूट स्वहीत साधण्यासाठी काही पदाधिकारी करीत असल्याचे दिसून येत आहे. तरीही महावितरण चा कणा महावितरणच्या नियोजन शून्य कारभाराचा कामगारांना फटा असलेले वाह्यस्रोत कंत्राटी कामगार दिवस रात्र काम करूनही त्यांच्या हक्काचे असलेले मानधन त्यांना वेळेवर मिळत नसल्यामुळे त्यांना मागील दोन महिन्याचा कालावधी पूर्ण झाला असूनही आष्टी सर्कल महावितरणच्या अनागोंदी, नियोजन शून्य कारभारामुळे त्यांना २ महिन्यापासून कोणताही पगार न देता दिवस रात्र मोठ्या प्रमाणात त्यांच्या बेरोजगारीचा फायदा घेत आर्थिक पिळवणूक करून कामे करून घेतली जात आहेत काम करताना त्यांच्या कडे कोणतीही ऑर्डर ही महावितरणचा कामावर रुजू असल्याची नाही. तरीही बेरोजगार महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित होण्याच्या भीतीने फक्त वरिष्ठांच्या फोन वरून मिळालेल्या आदेशावर स्वतःचा जीव धोक्यात टाकून मोठ्या प्रमाणात बीड जिल्ह्यातील बाहास्रोत कंत्राटी कामगार हे कामे करीत आहे. सदरची कामे करीत असताना एखादा अपघात झाल्यास याला जबाबदार कोण ? अशा प्रश्न उपस्थित झाला आहे. अपघाताचीजबाबदारी ही आज पर्यंत कोणत्याही महावितरण अधिकारी पदाधिकारी संबंधित अभियंता यांनी घेतल्याची दिसून येत नाही. काम करण्याचे आदेश देतात तशी अपघात झाल्यास जबाबदारी का स्वीकारत नाहीत ? बीड जिल्हातील कामगारांना तब्बल दोन महिन्याच्या पगारा पासून वंचित ठेऊन एक प्रकारे वाशिम सर्कल बाह्यस्रोत कंत्राटी कामगारावर हा अन्याय आहे असा आरोप करण्यात येत आहे.**

कंत्राटी बाहास्तोत कामगार यांनी वरिष्टकडे या बाबत विचारणा केली असता उडवा उडवी च्या उत्तरा शिवाय काहीही हाती लागले नाही. तरी मागील २ महिन्यांच्या पगार करून आमच्या कुटुंबावर आलेली उपासमारीची पाळी यातून आमची मुक्तता करावी अशी मागणी कंत्राटी बाहह्यस्रोत कामगार यांच्या कडून करण्यात येत आहे. आष्टी तालुका सोडून इतर तालुक्यातील बाहह्यस्रोत कंत्राटी कामगार यांना कामाच्या ऑर्डर्ससह पगारही वेळेवर करण्यात आला आहे. मात्र आष्टी तालुका वगळून वाह्यस्रोत कंत्राटी कामगारवर हा अन्याय नाही का असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा. क्र.२०२५/ सेतु कावि-०५
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
दिनांक ०९/०६/२०२५

**विषय- जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत. (जन्म - मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती संजय बन्सी गाडे रा. अंतरवाली सराटी ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या नामे सुरज संजय गाडे यांचा जन्म दि.०९/०८/२००८. २) कल्याणी संजय गाडी यांची जन्म दिनांक १९/११/२०१०

३) सृष्टी संजय गाडे यांची जन्म दि.०७/०९/२०१३ मुलगा/मुली च्या जन्म मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबधित अर्जदार विरुध्द ग्राम पंचायत कार्यालय अंतरवाली सराटी नगर पंचायत कार्यालय अंतरवाली सराटी यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५ (ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि. १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
जा. क्र.२०२५/ सेतु कावि-३४
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
दिनांक १०/०६/२०२५

**विषय- जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत. (जन्म - मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती काशिनाथ नागोराव मगरे रा. मार्डी ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या स्वतःच्या जन्म मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबधित अर्जदार विरुध्द ग्राम पंचायत कार्यालय मार्डी नगर पंचायत कार्यालय मार्डी यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५ (ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि. १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-०७
दिनांक-१६/०६/२०२५

## जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती देविदास आसाराम भोजने रा. लोणार मायगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | भारत देविदास भोजने | मुलगा | २१/११/२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १६/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३२
दिनांक-१६/०६/२०२५

## जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती इंदल देवचंद गुसिंगे रा. लोणार मायगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म/मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | आदेश इंदल गुसिगे | मुलगा | ०५/०५/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १६/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, वे६ सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज ८२४/२०२५**

सुशिला विरुध्द निरक

अर्जदार : १. श्रीमती सुशिला भ्र. रामराव रोहिटे वय ८० वर्षे धंदा घरकाम रा. शासकीय दूध डेअरी समोर, कातांगळे नगर, बार्शी रोड, बीड

२. दिपक पि. रामराव रोहिटे वय ४० वर्षे, धंदा नौकरी, रा. वरील प्रमाणे

३. सौ.अपर्णा भ्र.हनुमंत साबळे वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कर्झणी ता.जि.बीड ४. सुषमा भ्र. परमेश्वर इंगोले वय ४८ वर्ष धंदाघरकाम, रा. शिवतेज हातसिंग सोसायटी, पुणे शहर ता. जि. पुणे ५. रेश्मा भ्र. आदिनाथ काटकर ४६ वर्षे, धंदानौकरी, रा. कृषी कॉलनी, पालवन चौक, बीड

विरुध्द निरंक

**मागणी : भारतीय वारसा कायदा कलम ३७२ नुसार मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारम प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांचा मृत्यु दिनांक ०९/०२/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे भारतीय स्टेट बैंक शाखा राजुरी वेस, बीड मध्ये खाली दर्शविलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे रक्कम शिल्लक आहे.

परिशिष्ट-अ

| अ.क्र. | मयत खातेदाराचे नाव | बँकेचे नाव व खाते क्रमांक | जमा असलेली रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | रामराव पि. सुर्यभान रोहिटे | भारतीय स्टेट बैंक शाखा राजुरी वेस, बीड खाते क्र.५२०६७५७२२२६ | रु.३.६८,४११.१८/- |

मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे फळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रामराव पि. सुर्यभान रोहिटे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०६/२०२१५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.२५/०७/२०२५

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बीड.**

---

## जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**दूरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६**
**जा. क्र.२०२५/ सेतु कावि-११**
E-Mail ID: tahsildarambade gmail.com"
**दिनांक ०९/०६/२०२५**

**विषय- जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत. (जन्म- मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती सचिन सुभाष येडे रा. वाघलखेडा ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या नामे आर्यन सचिन येडे मुलगा च्या दि.०४/०३/२०१७ जन्म मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबधित अर्जदार विरुध्द ग्राम पंचायत कार्यालय वाघलखेडा नगर पंचायत कार्यालय बाघलखेडा यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५ (ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि. १२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/.**
**कार्यालय नगर परिषद, अंबड**
**दिनांक :- २३/०६/२०२५**

## नाव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : शेखर प्रदीप देशमुख

प्रकरण: कस्बे अंबड ता. येथील सिटी सर्वे नंबर १४९६ अंबड नगर परिषद घर नंबर ११५८/८ हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्यांद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (७) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही. वरील सदर मालमत्तेची

चतुः सिमा
पुर्व - सरकारी रस्ता
पश्चिम : विशाल आनंदकुमार जयस्वाल
दक्षिण : सौ. सुचिता कैलास बियाणी
उत्तर : सरकारी रस्ता

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# कांदा खरेदी घोटाळ्यासंबंधी उच्च न्यायालयात याचिका

## कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाकडून (सीएआय) मागणी

केंद्र सरकारकडून किंमत स्थिरीकरण योजनेअंतर्गत होणाऱ्या कांदा खरेदीत कोट्यवधी रुपयांचा अपहार झाला असून, त्याच्या चौकशीची मागणी करणारी रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाने दाखल करून घेतली आहे.कांदा खरेदीत मागील दहा वर्षांमध्ये सुमारे ५००० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप यामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे गैरव्यवहार करणाऱ्या घोटाळेबाज अधिकारी, शेतकरी उत्पादक कंपन्या व संबंधितांचे धाबे दणाणले आहे, अशी माहिती निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथील याचिकाकर्ते शेतकरी विश्वास माधवराव मोरे यांनी दिली.

उच्च न्यायालयात २२ एप्रिल रोजी २०२५ रोजी आर्थिक गैरव्यवहारासंबंधी याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवर १७ जून रोजी न्यायमूर्ती संगम विजय कोतवाल आणि न्यायमूर्ती श्याम सी. चांडक यांच्यासमोर सुनावणी झाली. तर पुढील सुनावणी १५ जुलै रोजी होणार आहे. केंद्र सरकारकडून होणाऱ्या कांदा खरेदीत 'नाफेड', 'एनसीसीएफ' आणि व्यापाऱ्यांच्या संघटनांनी संगनमताने शेतकऱ्यांचे अधिकार पायदळी तुडवून



राष्ट्रीय संपत्तीवर डल्ला मारल्याचा प्रकार केला आहे, असे याचिकाकर्ते मोरे यांचे आरोप आहेत. या घोटाळ्यामुळे मूळ शेतकरी लाभापासून वंचित राहिले, तर शेतकरी कर्जबाजारी झाले. अनेकांनी आर्थिक कोंडी आणि नैराश्यामुळे गर्तेत जाऊन आत्महत्या केल्या, त्यामुळे हा घोटाळा फक्त आर्थिक संबंधित नसून संविधानिक हक्कांचा आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन करणारा आहे, असे याचिकेत नमूद केले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत शेतकरी उत्पादक कंपन्या, कांदा व्यापारी, 'नाफेड' व 'एनसीसीएफ'चे अधिकारी, महसूल कर्मचारी आणि चार्टर्ड अकाउंटंट्स सहभागी असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे

### याचिकेतील प्रमुख मागण्या

केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), सक्तवसुली महासंचालनालय(ईडी), राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए), आर्थिक गुप्तचर विभाग (एफआययू), लोकायुक्त, मानवी हक्क आयोग, प्राप्तिकर व इतर संस्थांचा समावेश असलेल्या विशेष तपास पथकाची स्थापना करावी. 'नाफेड', 'एनसीसीएफ' आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्या सर्व कांदा साठवणूक व विक्री व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे. शेती योजनांवर न्यायालयीन देखरेखीखाली निगराणी ठेवणारी कायमस्वरूपी यंत्रणा निर्माण करावी. घोटाळ्यात सहभागींची बेकायदेशीर संपत्ती तत्काळ जप्त करावी. यासह महाराष्ट्रातील सर्व कांदा साठवणूक गोदामांची नोंदणी, जिओ-टॅगिंग आणि प्रमाणित वजन (वजन आणि मापे विभागामार्फत) अनिवार्य करण्यात यावे.

# पिकांसाठी पाणी कमी पडू लागल्यास वापरा केओलिन



वाढत्या उन्हामुळे पिकाची पाण्याची गरज वाढते. पिकाची पाण्याची गरज कमी करण्यासाठी किंवा कमी पाण्यातही पिकाने तग धरुन राहावे यासाठी शेतकरी बरेच उपाय करतात. पण बऱ्याच शेतकऱ्यांना बाष्परोधकाचा वापर करुन कमी पाण्यात ही पीक जगवता येत हेच माहीत नाही.

बाष्पीभवनामुळे जस जमिनितून पाणी वाफ स्वरुपात निघून जात त्याप्रमाणेच बाष्पोत्सर्जनामुळे पिकाच्या पानांतून पाणी निघून जात असत. कडक उन्हामुळे तर बाष्पोत्सर्जनाच प्रमाण खुप वाढत. त्यामुळे झाडे सुकतात आणि पिकाची पाण्याची गरज वाढते. ड्रॅगनफ्रूट, द्राक्ष, डाळिंब, आंबा, संत्री आणि कलिंगड या सारख्या फळांवर काळे डाग पडतात. यालाच सनबर्न असेही म्हणतात. याशिवाय पाने करपणे, पिकाची वाढ खुंटणे, अन्नद्रव्यांचा पुरवठा कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. असं नुकसान होऊ द्यायच नसेल आणि झाडातील पाणी टिकवून ठेवायच असेल तर बाष्परोधकाचा वापर करतात.

कोणत बाष्परोधक चांगले :

बाजारात विविध प्रकाराचे बाष्परोधक उपलब्ध आहेत त्यापैकी केओलिन हे बाष्परोधक जास्त परिणामकारक आहे. वजनाने हलक्या असलेल्या विशिष्ट दगडापासून हे केओलिन तयार करतात. बाजारात उपलब्ध असलेले कच्चे केओलिन हे पिकांना हानिकारक ठरते.

कारण यामध्ये लीड, अर्सेनिक यासारखे विषारी घटक असतात. या केओलीनवर प्रक्रिया करुन ते शुद्ध केलं जातं. हे केओलिन जनावरांच्या औषधात, पशुखाद्यातही वापरल जात. केओलिनचा वापर केल्यानंतर पानांवर एक विशिष्ट प्रकारचा थर तयार होतो. हा थर पानाच्या आतील पेशी भोवती संरक्षक कवच म्हणून कार्य करते. त्यामुळे अनेक रसशोषक किडी आणि रोगाना प्रतिबंध होतो. त्यामुळे पिकांचे रोग व किडींपासूनही संरक्षण होते.

असा करा केओलिनचा वापर :केओलिनचा वापर हा फवारणीद्वारे केला जातो. फवारणीसाठी ५ ते १० ग्रॅम केओलिन एक लिटर पाण्यात मिसळून फवारावे. उन्हाळ्यात कमीत कमी १० ते १५ दिवसांच्या अंतराने केओलिनची फवारणी करावी. म्हणजे पाणी कमी असेल तर पीक तग धरुन राहील. तुमच्याकडे जर पाणी कमी असेल आणि फळबाग असेल तर केओलीनचा वापर करुन बघा.

# फळबागेत संजीवकांचा वापर केल्यास होईल आर्थिक फायदा

पिकाच्या आणि फळबागांच्या भरघोस उत्पादनासाठी विविध प्रकारच्या पोषक घटकांची गरज असते व ही गरज विविध प्रकारचे रासायनिक खते तसेच विद्राव्य खतांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. या सगळ्या व्यवस्थापनामध्ये फळबागांसाठी संजीवकांचा वापर हा खूप महत्त्वाचा असतो. फळबागामध्ये संजीवकांचा वापराचे फायदे नेमके काय आहेत हे आपण जाणून घेणार आहोत.

संजीवके म्हणजे काय? सजीव वनस्पतींमध्ये जी रासायनिक द्रव्य प्रमाणामध्ये कार्यरत होऊन त्या वनस्पतीच्या अंतर्गत कार्यपद्धतीत बदल घडवून आणतात त्यांना वनस्पती संजीवके म्हणतात. संजीवकांचे वाढ प्रेरक आणि वाढ निरोधक असे दोन मुख्य प्रकार आहेत.

फळझाडांमध्ये संजीवकांचे उपयोग : १) वनस्पतीमध्ये अभिवृद्धी करण्यासाठी- जेव्हा आपण कलमा करतो तेव्हा फाटे व गुटी कलमांना लवकर आणि भरपूर मुळे येण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. शेंडा कलम, भेट कलम आणि डोळा भरणे या कलम पद्धतीत खुंट आणि सायन यांचे मिलन साधून एकजीव होण्यासाठी संजीवके मदत करतात. कलमे जगण्यासाठी आणि चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी देखील संजीवकांचा उपयोग होतो. २) फळांचा बहर नियंत्रित करण्यासाठी- फळांमध्ये फुलांचा बहर येण्याअगोदर झाडांची शाखीय वाढ पूर्ण व्हावी लागते. वनस्पतीच्या अंतर्गत शरीरक्रिया आणि बाह्य वातावरण यांच्या एकत्रित परिणामामुळे शाखिय वाढ पूर्ण होण्यासाठी कमी अधिक वेळ लागतो.



शाखीय वाढ होऊन ती पक्व झाल्यावर डोळ्यात फुलांची निर्मिती होते. ही निर्मिती काही काळ सुप्तावस्थेत राहते आणि ठराविक कालावधीनंतर डोळ्यातून फुलांचा मोहर बहराच्या रुपाने बाहेर पडण्यासाठी फळझाडांची अंतर्गत स्थिती आणि बाह्य वातावरणातील वातावरणातील सूर्यप्रकाश, आद्रता आणि तापमान या घटकांचा समन्वय साधण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. ३) झाडांच्या आकार मर्यादित राखण्यासाठी व उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी- बऱ्याचदा आपण पाहतो की फळ झाडांचा विस्तार जास्त मोठा होतो व त्यावर फळे खूप कमी लागतात. झाडांची वाढ झाल्यामुळे फळांची निगा राखणे व काढणे या गोष्टीदेखील अडचणीच्या होतात. अशा मध्ये झाडांची वाढ आणि विस्तार मर्यादित राखण्यासाठी मॅलिक हायड्रोझाईन क्लोरमक्काट इत्यादी संजीवके उपयुक्त ठरतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे फळझाडांच्या मर्यादित वाढ आणि विस्तारामुळे दर हेक्टरी झाडांची संख्या वाढवून घेता येते आणि उत्पादन क्षमता वाढते. ४) फळपिकांचा काटकपणा आणि उत्पादन क्षमता- फळबागांमध्ये संजीवकांचा वापर करून झाडांना काटकपणा तसेच उत्पादनाची सुरुवात लवकर करता येते. आपल्याला माहित आहेच कि बरीच फळझाडे बहुवर्षीय असल्यामुळे सुरुवातीचे काही वर्षे फक्त त्यांची शाखीय वाढ होत असते. ही वाढ होत असताना संजीवकांचा वापर केला तर शाखीय वाढीवर मर्यादा येऊन फळे येण्याची व्यवस्था लवकर सुरू होते. शाखीय वाढ होत असताना शाखात लुसलुशीतपणा असतो व त्यामुळे हा भाग विशेष हवामानातील पाणीटंचाई किंवा रोग व किडींना लवकर बळी पडतो. परंतु संजीवकांचा वापर केल्यावर हा भाग कणखर बनतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२६० : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे पहिले सुलतान कुतुबुद्दीन ऐबक यांचा तत्कालीन भारतातील लाहोर या प्रांतात राज्याभिषेक करण्यात आला.
१४४१ : इटन कॉलेजची स्थापना.
१५७१ : मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
१७९३ : फ्रान्समधील पपहिल्या प्रजासत्ताक घटनेचा अवलंब केला गेला.
१८८० : ओ कॅनडाचे हे गाणे कॅनडाचे राष्ट्रगीत म्हणून पहिल्यांदा गायले गेले.
१९३९ : सयामचे थायलँड असे नामकरण करण्यात आले.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्स व इटलीमधे शस्त्रसंधी झाली.
१९६१ : भारतात निर्मित स्वदेशी एच. एफ २४ सुपर सोनिक लढाऊ विमानाणे भरारी घेतली.
१९६६ : मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एयर इंडियाच्या विमान स्वित्झर्लंड देशांतील माउंट ब्लांकमध्ये दुर्घटनाग्रस्त झाल्यामुळे ११७ नागरिक ठार झाले.
१९८२ : कर्नाटकातील सर्व शाळांत कन्नड भाषा शिकविण्याची सक्ती करण्यात आली.
१९९६ : मायकेल जॉन्सनचा १९.६६ सेकंदांत २०० मीटर धावून विश्वविक्रम.
१९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा 'चित्रभूषण पुरस्कार' जाहीर
२००१ : 'आय. एन. एस. विराट' ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल झाली.
२००४ : न्यू यॉर्क राज्यात मृत्युदंड असंवैधानिक ठरवण्यात आला.
२०१० : जुलिया गिलार्ड यांनी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन इतिहासाचार्य इतिहासकार, अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि वक्ते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन.
१८६२ : रविकिरण मंडळाचे संस्थापक श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८६९ : दामोदर हरी चाफेकर चार्ल्स रँड याची हत्या करणारे (मृत्यू: १८ एप्रिल १८९८)
१८९२ : श्रीधर बाळकृष्ण रानडे रविकिरण मंडळाचे संस्थापक (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८९७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ 'प्रणव रंग' गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (मृत्यू: २९ डिसेंबर १९६७)
१८९३ : द वॉल्ट डिस्नी कंपनी चे सह-संस्थापक रॉय ओ. डिस्नी यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९७१)
१८९९ : मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक यांचा जन्म (मृत्यू: ८ एप्रिल १९७४)
१९०८ : गुरू गोपीनाथ कथकली नर्तक (मृत्यू: ९ आक्टोबर १९८७)
१९२७ : तामिळ लेखक कवियरासू कन्नडासन यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९८१)
१९२८ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (मृत्यू: १७ जुलै २०१२)
१९३७ : ज्येष्ठ लेखिका अनिता मुजूमदार देसाई यांचा मसुरी येथे जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५४ : भारतीय इतिहास कालखंडातील प्रसिद्ध वीरांगना गोंडवाना राज्याच्या राज्यकर्त्या राणी दुर्गावती यांचे निधन.
१८८१ : हिंदू मठाधिपती, समाजसुधारक व लेखक तसचं, आधुनिक पंजाबी गद्याचे जनक पंडित श्रद्धाराम शर्मा यांचे निधन.
१९०८ : अमेरिकन राजकारणी व अमेरिकेचे माजी अध्यक्ष स्टीफन ग्रोव्हर क्लेव्हलँड यांचे निधन. अमेरिकन इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होते ज्यांनी राष्ट्रपती पदाचा सलग दोनवेळा कारभार सांभाळला.
१९१४ : वासुदेव गणेश टेंबे उर्फ टेंबे स्वामी किंवा वासुदेवानंद सरस्वती यांचा गरुडेश्वर, बडोदा, गुजरात येथे निधन. (तारखेप्रमाणे)
१९४७ : बौद्ध धर्माचे अभ्यासक पंडित धर्मानंद कोसंबी यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९८० : स्वतंत्र भारताचे चोथे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटा गिरी उर्फ वी. वी. गिरी यांचे निधन.
१९९७ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (जन्म: २४ ऑगस्ट १९४४)
२०१३ : इटलीचे वे४० पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९२०)

# काकडी लागवड तंत्रज्ञान

काकडी हे भारतीय पिक असल्याने सर्व देशभर याची लागवड केली जाते. काकडी कोकणासारख्या अतिपर्जन्याच्या प्रदेशात देखील पावसाळी हंगामात काकडीचे भरपूर उत्पादन निघते. काकडी पासून कोशिंबिर बनविली जाते. त्यामुळे या वेलवर्गीय भाजीचे आहारामध्ये दररोज उपयोग होतो. महाराष्ट्रामध्ये अंदाजे ३७११ हेक्टरवर या पिकाची लागवड होते.

हवामान आणि जमीन :काकडी हे उष्ण आणि कोरडया हवामानात वाढणारे पीक आहे. पाण्याचा उत्तम निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन या पिकास योग्य असते.

लागवडीचा हंगाम : काकडीची लागवड खरीप आणि उन्हाळी हंगामात होते. खरीप हंगामासाठी काकडीची लागवड जून - जूलै महिन्यात व उन्हाळी हंगामामध्ये जानेवारी महिन्यात करतात.

वाण : शीतल वाण - ही जात डोंगर उताराच्या हलक्या आणि जास्त पावसाच्या प्रदेशात चांगली वाढते. बी पेरणीपासून ४५ दिवसांनी फळे चालू होतात. फळे रंगांनी हिरवी व मध्यम रंगाची असतात कोवळया फळांचे वजन २०० ते २५० ग्रॅम असते हेक्टरी उत्पादन ३० ते ३५ टन मिळते. पुना खिरा - या जातीमध्ये हिरवे आणि पिवळट तांबडी फळे येणारे दोन प्रकारचे बियाणे बाजारात मिळते. ही लवकर येणारी जात असून फळे आखूड असतात. ही जात उन्हाळी हंगामात चांगली असून हेक्टरी उत्पादन १३ ते १५ टन मिळते. प्रिया - ही संकरीत जात असून फळे रंगाने गर्द हिरवी व सरळ असतात. हेक्टरी उत्पादन ३० ते ३५ टन मिळते. पुसा संयोग - लवकर येणारी जात असून फळे हिरव्या रंगाची असतात. हेक्टरी उत्पादन २५ ते ३० टन मिळते. या शिवाय पॉइंट सेट, हिमांगी, फुले शुभांगी यासारख्या जाती लागवडीस योग्य आहेत.


बियाणे प्रमाण : या पिकाकरीता हेक्टरी २.५ ते ४ किलो बियाणे लागते.

पुर्वमशागत व लागवड : शेतास उभी आडवी नांगरणी करुन ढेकळे फोडून काढावी व एक वखारणी द्यावी. शेतात चांगले कुजलेले ३० ते ५० गाडया शेणखत टाकावे. नंतर वखरणी करावी. उन्हाळी हंगामासाठी ६० ते ७५ सेमी अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात. खरीप हंगामात कोकण विभागास काकडीची लागवड करावयाची असल्यास दर ३ मीटर अंतरावर ६० सेमी रूंदीचे ३० सेमी खोलीचे चर खोदूर चरांच्या दोन्ही बाजूंना ९० सेमी अंतरावर ओळी ३० बाय ३० बाय ३० सेमी अंतरावर आकाराचे खडडे तयार करावेतत्र प्रत्येक खडडयात २ ते ४ किलो शेणखत मिसळावे. प्रत्येक आळयात ३ ते ४ बिया योग्य अंतरावर लावाव्यात.

खते व पाणी व्यवस्थापन : काकडी पिकास ५० किलो नत्र ५० किलो पालाश ५० किलो स्फूरद लागवडीपूर्वी द्यावे. व लागवडीनंतर १ महिन्याने नत्राचा ५० किलोचा दुसरा हप्ता द्यावा व पावसाळयात ८ ते १० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे व उन्हाळयात ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

आंतरमशागत : काकडीच्या वेलांना आधार दिल्यास फळांची प्रतीक्षा सुधारते परंतू ते खर्चिक असल्याकारणाने महाराष्ट्रामध्ये काकडीचे पीक जमिनीवर घेतले जाते. लागवडीनंतर २५ ते ३० दिवसांनी पिकातील गवत काढून टाकावे. फळे लागल्यानंतर फळांचा संपर्क मातीशी येऊ नये म्हणून फळांखाली वाळलेला काटक्या घालाव्यात.

काढणी व उत्पादन : फळे कोवळी असतानाच काढणी करावी म्हणजे बाजारात चांगला भाव मिळतो. काकडीची तोडणी दर दोन ते तीन दिवसांच्या अंतराने करावी. जाती व हंगामानुसार काकडीचे हेक्टरी २०० ते ३०० क्विंटल पर्यंत उत्पादन मिळते.



# लोकलढा पाणी आंदोलनास भगवानगडचा आशिर्वाद

## महंत नामदेव महाराज शास्त्री, समन्वयकांनी मांडली भूमिका

बीड । प्रतिनिधी

जायकवाडीच्या पाण्यासाठी १४० गावांनी एकत्र येत जे लोकलढा आंदोलन उभे केले आहे, हे शेतकरी व ग्रामस्थांच्या पिढ्यानपिढ्या कल्याणाचे आंदोलन आहे,या आंदोलनास श्री क्षेत्र भगवान गडचे आशीर्वाद असल्याचे प्रतिपादन महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी केले. लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंत नामदेव महाराज शास्त्री यांची भेट घेऊन भूमिका मांडली यावेळी महंत नामदेव महाराज शास्त्री बोलत होते.

यावेळी बाबुराव जेठे, राजाभाऊ महाराज कुटे, विठ्ठलराव शेळके, पोलीस पाटील काशीनाथ जोगदड, माजी सरपंच लक्ष्मण तात्या नागरगोजे, शिवहारी नागरगोजे, चेअरमन भाऊसाहेब जोगदंड, विजयकुमार करपे पाटील, शामराव घुगे, गोविंद माने, बालासाहेब शेरकर, गणेश जाधव, पत्रकार संतोष भारती, राहुल लोंढे, रामेश्वर पवळ, अण्णासाहेब देवगुडे मामा, रामचंद्र पाटील चव्हाण, बाबासाहेब नागरगोजे, शंकर पटुळे व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा करताना लोकलढा आंदोलनाचे समन्वयक म्हणाले, की जायकवाडी धरणाच्या पाण्याशिवाय शिरूर, मातोरी, चकलांबा ते तालखेड, एकदरा पर्यंतच्या पाण्यापासून वंचित असलेल्या भागाचा विकास होणार नाही. शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, स्थलांतर, शेतकर्यांच्या मुलांचे लग्न, गर्भाशय काढणे असे सामाजिक प्रश्न दूर करून शेतकर्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी लिफ्ट करून भगवान गडाच्या पायथ्याशी सोडणे गरजेचे आहे, भगवान गड ते तारखेपर्यंत उपकालवा करावा, सिंदफणात पाणी सोडून साखळी बंधारे करावेत या योजना करणे गरजेचे आहे.

यासाठी शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव व वडवणी तालुक्यातील गावांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. यावर बोलताना महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले, की शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी असलेल्या या आंदोलनास भगवानगडचा आशीर्वाद आहे. या मागण्यांसाठी जी मदत लागेल, ती संपूर्ण मदत आपण करू, असेही महंत नामदेव महाराज शास्त्री म्हणाले. महंतांनी पूर्ण सहकार्याचे आशीर्वाद दिल्याने लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी महंतांचे आभार मानले.



### महंतांच्या आशीर्वादाने लोकलढ्यास बळ-लोंढे

सर्वसामान्य कुटुंबातील तरूण व शेतकरी यांनी आपल्या भागातील शेती बारामती पॅटर्न प्रमाणे बारमाही पाणीदार करण्यासाठी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या लोकलढ्यास महंत शिवाजी महाराज, महंत नामदेव महाराज शास्त्री, उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्यासह साधुसंत, वारकरी संप्रदायातील अधिष्ठाण असलेले व्यक्ती यांचे आशीर्वाद मिळाले आहेत. महंतांच्या आशीर्वादामुळे या लोकलढा आंदोलनास बळ मिळाल्याचे मत समन्वयक राहुल लोंढे यांनी व्यक्त केले.

# केएसकेच्या कृषीदुतांनी कापूस लागवड विषयक उपक्रम राबवला




बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के. एस. के. (काकू) कृषी महाविद्यालय बीड येथील कृषीदुतांनी मौजे कामखेडा या गावा मध्ये जाऊन तेथील शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना कापूस लागवड प्रक्रिया विषयीचे महत्त्व सांगितले व लागवड प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले सहसा बियाणांची उगवण क्षमता कमी जास्त असते शेतकरी प्रत्येक वेळेस बियाणे विकत घ्यायचे टाळत असतो म्हणून तो मागील हंगामाचे बियाणे पुढील हंगामासाठी जपून ठेवतो व तेच बियाणे पेरणीसाठी वापरतो पण बियाणा मधील काही बदलांमुळे त्याची उगवण क्षमता कमी होते आणि तसेच शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने पेरणी करावी लागते यात शेतकऱ्याचे खूप मोठे नुकसान होऊ शकते हेच नुकसान थांबवण्यासाठी कृषिदुतांनी मौजे कामखेडा मध्ये जाऊन तेथील शेतकऱ्यांना कापूस लागवडीचे महत्व पटवून दिले व तेथील मुख्य पीक कापूस यावर त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले यामध्ये शेतकऱ्यांनीही चांगला प्रतिसाद दिला यामध्ये तरुण शेतकऱ्यांचा प्रतिसाद हा उत्स्फूर्त होता नंतर कृषी दूतांनी शेतकऱ्यांना आलेल्या अडचणीचे व पडलेल्या प्रश्नांचे निवारण देखील केले. ही सगळी माहिती देण्यासाठी कृषी दूतांना संस्थेचे सहसचिव डॉ.

जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक डॉ. एस. टी. शिंदे, उपक्रमाचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक एस. एस. राठोड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच यावेळी कृषीदूत व्यंकटेश कदम, युवराज खाडे, किशोर मलपुरे, योगेश कुटे, ऋतिक सोनार, श्रीकृष्ण शिंदे आणि फारुक शेख हे उपस्थित होते.

# अंबड पालिकाच्या खुले जाग्यावरील आंतरराष्ट्रीय योगा दिन



अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील सार्वजनिक योग महोत्सव नगरपरिषद अंबड च्या वतीने, तालुका प्रशासन, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग आणि नियमित योग साधकांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी योग शिबीर आयोजित करण्यात आले आहे शनिवार दि. २१ जून रोजी पहाटे ५:३० वाजता सुरुवात झाली सदरील योगा छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्र इथे संपन्न झाली यावेळी अंबड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते अंबड नगर परिषद च्या खुल्या जागेवरील छत्रपती योग वं क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर आज २१ जून रोजी पहाटे ५:३० ते ७:१५ पर्यंत योग शिबीर घेऊन नियमित योग साधकांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्सहात साजरा करण्यात आला.

नियमित योग साधनेचा धडा देणारे श्री घनश्याम शिंदे यांनी विवेचन करुन प्रत्यक्षिके द्वारे सुंदर योग सत्र घेतले. याप्रसंगी नप च्या पल्लवी देशपांडे, अग्निशमनदलाचे प्रमुख श्री जयसिंग सांगळे, अंबड शहरातील स्वामी समर्थ मंदिर येथे नियमित योग वर्गातील जेष्ठ योग साधक डॉ. कल्याण जोशी, ऍड. भागवत लहाने, श्री चिंताम्बर मेटकर, श्री भाऊसाहेब आंधळे, डॉ वाय बी कुलकर्णी, श्री राजेंद्र देशमुख, श्री प्रदीप लुखे, श्री नारायण तिकांडे, श्री सीताराम वाघ यांनी योग साधनेचा लाभ घेऊन सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.श्री देवा चित्राल यांनी सूत्रसंचालन करुन आभार व्यक्त केले.

# ममता नगर भागातील नाल्याचे काम त्वरित सुरु करा -रिंकल तायड

जालना । प्रतिनिधी

ममता नगर भागातील नाल्याचे काम महानगरपालिकेने त्वरित सुरू करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.चंदनझिरा ममता नगर भागातील नाल्याचे काम पूर्ण झाले नसल्याने परिसरात सर्वत्र चिखल ,माती व सांडपाणी साचल्यामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य असून परिसरात रोगराई पसरली असल्याने नागरिक परेशान आहेत. वारंवार मागणी करूनही नालीचे काम पूर्ण होत नसल्याने आज सुनील बोर्डे व कमल बोर्डे यांनी स्वखर्चातून ममता नगर भागात कच्ची नाली तयार करून तात्पुरत्या स्वरूपात समस्याचे निर्मूलन केले असले तरी लवकरच महानगरपालिकेने या कच्च्या नाली चे काम पूर्ण करून परिसरातील लोकांना आजारापासून मुक्त करावे असे आवाहन राष्ट्रवादी महिला आघाडीच्या वतीने केले आहे

सुनील बोर्डे यांच्या घरापासून शौकत मामू यांच्या घरापर्यंत सुनील बोर्डे यांनी स्वखर्चातून अंदाजे अडीचशे ते तीनशे फूट लांबीची कच्ची नाली तयार केली आहे . राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रुपालीताई चाकणकर यांच्या आदेशानुसार विविध प्रकारच्या समस्याचे निर्मूलन करण्यासाठी जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनखाली शहरात महिला आघाडीच्या वतीने आज ममता नगर भागात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुनील बोर्डे, अनिल बोर्डे , मंदा ठोकळ यांची उपस्थिती होती.

यावेळी रिंकल तायड , मंदा ठोकळ यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले. जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच महानगरपालिके समोर निदर्शने करण्यात येणार असल्याचे या पत्रकाद्वारे कळवले आहे. यावेळी मंदा ठोकळ , छाया बोर्डे,अनुराधा लोखंडे, विजय ठोकळ, वैशाली बोर्डे, ज्योती खरात, सरताज पठाण, साजेदा पठाण, रुकसाना शेख, सुमय्या शेख, सुलावती बोर्डे, तेजराव बोर्डे यांची उपस्थिती होती.



# योगाने मानसिक समाधान मिळायला मदत होते -गिता पवार

## महिलांना तीन वर्षांपासून योगाचे धडे

गेवराई। प्रतिनिधी

धावपळीच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी शारिरीक, मानसिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. योगाच्या बळावर महिलांचे आरोग्य संतुलित राहते. म्हणून, योग महिलांसाठी काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिजामाता योगा ग्रुपच्या संचालिका सौ. गिता भाभी पवार यांनी बोलताना केले. शनिवार ता. २१ रोजी सकाळी पाच ते सात , या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.

२१ जून जागतिक योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर, जिजामाता योग ग्रुपच्या वतीने

गेवराई येथील गजानन मंगल कार्यालयातील भव्य सभागृहात सकाळी पाच ते सात, या वेळेत योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी, बोलताना सौ. गिता भाभी पवार म्हणाल्या की, धावपळीचे आयुष्य झाले आहे. काळानुरूप बदल झाल्याने, माणसांचे आयुष्य घडाळाच्या काट्यावर पळते आहे. धावपळीत आरोग्याकडे दूर्लक्ष होते. त्याचे दुष्परिणाम होतात. महिलांचे आरोग्य खूप महत्त्वाचे असून, त्याकडे



जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. चांगल्या आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा आहे. महिलांचे मानसिक, शारीरिक, भावनिक आरोग्य व्यवस्थित ठेवायचे असेल तर, महिलांनी आपल्या आरोग्यासाठी वेळ दिलाच पाहिजे. आरोग्याच्या बाबतीत तडजोड करू नका. त्यासाठी, नियमित व्यायाम, योगा आवश्यक आहे. जिजामाता योगा ग्रुपच्या माध्यमातून आम्ही सगळ्या महिला, तीन वर्षांपासून नियमित योगा करीत आहोत. आम्ही एकत्र आल्याने, विचाराची देवाणघेवाण झाली. बचत गटा सारखी आत्मनिर्भर चळवळ उभी करता आली. हे सामुहिक यश आहे. या व्यासपीठावर विविध सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेता आला. महिलांची आरोग्य तपासणी, सहली, सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासून काम करण्याची आम्हाला संधी मिळाली आहे. महिलांनी एकत्र येऊन योगा ग्रुप तयार करावेत, त्या माध्यमातून बचत गट स्थापन करावेत. योगा मुळे महिलांचे आरोग्य चांगले राहते. त्या शिवाय, स्वावलंबनाचा मार्ग आयुष्यात अंत्यत गरजेचा असल्याचे ही, सौ. पवार यांनी शेवटी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योग गुरु अनुसया मुनेश्वर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ ऋतुजा मुंढे या होत्या. गायकवाड सर व चाळक सर यांनी योगा बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशिल टकले सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रत्नमाला नानी मोटे, माधुरी कुरकुटे यांच्यासह जिजामाता योगा ग्रुपच्या महिलांचे सहकार्य लाभले.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १८४/२०२५**

**ॲड. व्ही.एम मिसाळ**

**कृष्णा वि. निरंक**

अर्जदार : १) कृष्णा पि. गुलाब भिल्लारे, वय २२ वर्ष, धंदा शेती, २) हिराबाई पि. गुलाब भिल्लारे (विवाहापूर्वीचे नांव) हिराबाई भ्र. कैलास मुळीक (विवाहानंतरचे नांव) वय ३७ वर्ष, धंदा घरकाम दोन्ही रा. भिलारवाडी तहत जाटनांदुर, ता. शिरूर कासार, जि. बीड. ३) लक्ष्मी पि. गुलाब भिल्लारे (विवाहापूर्वीचे नांव) लक्ष्मी भ्र.अशोक सारगुडे (विवाहानंतरचे नांव) वय २८ वर्ष, धंदा घरकाम, रा. माळेवाडी, ता. शिरुर कासार, जि. बीड.

अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत. ज्यापोक्षा मयत गुलाब पि. बप्पाजी भिल्लारे यांचा मृत्यू दि. २१.०३.२०२४ रोजी मालेगाव (बु.), ता. बारामती, जि. पुणे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर बारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे बारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांया हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल,

**आज दिनांक २३.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.सदर प्रकरणात पुढील तारीख ०७.०८.२०२५ ही आहे.**

आदेशावरून

स्वाक्षरित | (शिक्का) | स्वाक्षरित

**क लिपीक** | | **सहा. अधिक्षक**

दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.


# आशा व गटप्रवर्तकांच्या थकीत मानधनावर दिल्लीत तोडगा

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सुमारे ७० हजार आशा स्वयंसेविका आणि ३,५०० गटप्रवर्तक यांचे गेल्या पाच महिन्यांपासून थकीत असलेले मानधन लवकरच मिळण्याची शक्यता आहे. केंद्रीय आरोग्य संचालक वैभव घालमे यांच्याशी निर्माण भवन, नवी दिल्ली येथे बीड, महाराष्ट्राचे शिस्टमंडळासोबत सकारात्मक चर्चे झाली असून लवकरच मानधन मिळणार आहे. जर प्रश्न मार्गी लागला नाही तर दिल्लीच्या जंतर-मंतरवर आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

१८ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजता घालमे यांच्या दालनात झालेल्या चर्चेत प्रतिनिधींनी आशा व गटप्रवर्तकांच्या थकीत मानधनाची व्यथा मांडली. यावर प्रतिक्रिया देताना घालमे यांनी सांगितले की, ''राज्य शासनाकडे केंद्र शासनाकडून बजेट वर्ग करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून,



लवकरच एकाच हप्त्यात निधी पाठवला जाईल.'' त्यानंतर शिष्टमंडळाने आरोग्य मंत्रालयातील नियोजन विभागाचे केंद्रीय उपसचिव डॉ. कौस्तुभ गिरी यांची भेट घेतली.

यावेळी त्यांनी सात वर्षांपूर्वी निश्चित केलेल्या मोबदल्यात महागाई लक्षात घेता वाढ करण्याची मागणी केली. डॉ. गिरी यांनीही यावर सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले, ''मोबदलावाढीवर केंद्र शासनामध्ये काम सुरू असून लवकरच यासंबंधी घोषणा होईल.'' महाराष्ट्र राज्य आशा व गटप्रवर्तक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख, प्रदेश कार्याध्यक्षा कमलताई बांगर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे शिष्टमंडळ दिल्लीत धडकले त्यामध्ये दत्ता देशमुख, सचिन आंधळे व निलेश दातखिळे यांचा समावेश होता. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे उपस्थित नसल्याने त्यांचे स्वीय सहाय्यक श्री. जीवन बच्छाव यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

त्यांनी ही बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्याचे आश्वासन दिले. मोबदल्याच्या वाढीसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलनाची गरज असून, लवकरच दिल्लीतील जंतर-मंतरवर आशा व गटप्रवर्तकांचे आंदोलन होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### आशा व गटप्रवर्तकांसाठी दिल्लीत दिलासा!

५ महिन्यांचे थकीत मानधन लवकर मिळणार आहे. मोबदल्यात वाढीबाबत केंद्र सरकार सकारात्मक आहे. आरोग्य संचालक व उपसचिवांशी महाराष्ट्राच्या शिस्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. ५ महिन्यांचे थकीत मानधन लवकरच निधी राज्याकडे वर्ग होणार त्यामुळे आशा व गटप्रवर्तकांसाठी दिल्लीत दिलासा मिळाला आहे.


## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

E-Mail ID tahsildarambad gmail.com

**दूरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६**

जा. क्र.२०२५/सेतु/कावी ४४ दिनांक १०/०६/२०२५

**विषय जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.**

**(जन्म-मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती दिलीप राम जाधव रा. मसाई तांडा ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या स्वतःच्या दि. १०/०७/१९८६ जन्म-मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबंधित अर्जदार विरुद्ध ग्राम पंचायत कार्यालय मसाई नगर पंचायत कार्यालय मसाई यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५(ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित्त अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयात पाठविण्यात यावे

स्वाक्षरित

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

E-Mail ID tahsildarambad gmail.com

**दूरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६**

जा. क्र.२०२५/सेतु/कावी २५ दिनांक १०/०६/२०२५

**विषय जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.**

**(जन्म-मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती संगीता प्रभाकर लोहकरे रा. शिराढोण ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या स्वतःच्या जन्म-मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबंधित अर्जदार विरुद्ध ग्राम पंचायत कार्यालय शिराढोण नगर पंचायत कार्यालय शिराढोण यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५(ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे. त्यामुळे संबधित्त अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयात पाठविण्यात यावे.

स्वाक्षरित

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

E-Mail ID tahsildarambad gmail.com

**दूरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६**

जा. क्र.२०२५/सेतु/कावी १५दिनांक १२/०६/२०२५

**विषय जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.**

**(जन्म-मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान/श्रीमती सुनिल चंद्रकांत तारख रा. अंतरवाली सराटी ता. अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या नामे मुलगा च्या दि. १२/०८/२००६ जन्म-मृत्यू नोंद घेणे कामी अर्ज सादर केला आहे. त्यानुषंगाने संबंधित अर्जदार विरुद्ध ग्राम पंचायत कार्यालय अंतरवाली सराटी नगर पंचायत कार्यालय अंतरवाली सराटी यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमृनों २५२५(ई. ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.त्यामुळे संबधित्त अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयात पाठविण्यात यावे.

स्वाक्षरित

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# लिंबागणेश जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२१ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले.मानसिक आरोग्य त्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असल्याची शिकवण दिली. शाळेच्या निसर्गरम्य प्रांगणात व प्रसन्न वातावरणात इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ताडासन, वज्रासन, भुजंगासन, पश्चिमोत्तानासन, त्रिकोणासन, पवनमुक्तासन, सुर्य नमस्कार आदी योगासने करण्यात आली. विद्यार्थ्यांना अनुलोम -विलोम, कपाल भाती, भ्रामरी, भस्त्रीका, नाडी शोधन, प्राणायाम आदींची माहिती देण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक आगम ,चौरे बी.बी.सहशिक्षिका श्रीमती माधुरी कुलकर्णी,आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. योग प्रशिक्षण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमर पुरी यांनी केले.

# रानडुकराच्या हल्ल्यात जखमी शेतकऱ्याचा अखेर मृत्यू

## रानडुकरांचा बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शेतात जात असताना अचानकपणे रानडुकराने जोरदार धडक दिल्याने जखमी झालेल्या तालुक्यातील देपेगाव येथील शेतकरी श्रीकिसन रंगराव काळे (५८) यांचा बीड येथे उपचार सुरू असताना मृत्यू झाल्याची घटना घडली.**

माजलगाव तालुक्यातील देपेगाव येथील शेतकरी श्रीकिसन काळे हे मागील पंधरा दिवसापूर्वी सकाळी नऊच्या सुमारास आपला मुलगा अमोल याच्यासह शेतात आंबे आणण्यासाठी गेले असताना अचानक्? शेतातून समोर आलेल्या रानडुकराने त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. या हल्ल्यात श्रीकिसन यांच्या पोटात जबर वार बसला व त्यांच्या आतड्यास इजा झाली. यावेळी अमोल याने आरडाओरडा केल्याने रानडुक्कर पळून गेले, त्यानंतर जखमी श्रीकिसन यांना तातडीने माजलगाव येथील खासगी हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचार करून बीड येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर पंधरा दिवस उपचार केल्यानंतर उपचार सुरू असताना अखेर त्यांचा दि १८ जून रोजी मृत्यू झाला.त्यांच्यावर देपेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत शेतकरी श्रीकिसन काळे यांच्या पश्चात पत्नी, पाच मले. सना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मयत काळे यांच्या कुटुंबाला शासनाने नियमा प्रमाणे आर्थिक मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांच्या कडून होत आहे. दरम्यान या परिसरात रानडुकरांची संख्या झपाट्याने वाढत असून या रान डुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे



# नाथापूर येथे पुन्हा घरफोडी

## मागील प्रकरणांचा शोध लागेना

### पिंपळनेर पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

**नाथापूर । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेले नाथापूर हे गाव मागील काही महिन्यांपासून चांगलेच चर्चेत आहे.गावातील अवैध धंद्यांवर प्रशिक्षणार्थी डीवायएसपी पूजा पवार यांनी चांगलाच जम बसवून सर्व अवैद्य धंदे जवळपास बंदच करून टाकले,परंतु त्यांच्या कार्यकाळात नाथापूर येथे जबरी चोरी झाली होती त्याचा तपास चालू असताना आणि त्यांची बदली होताच पुन्हा दुसऱ्यांदा नाथापूर येथे चार ते पाच ठिकाणी चोरीच्या घटना घडल्याची माहिती मिळत आहे.यामध्ये सुरेश लुचारे,भाऊसाहेब वक्ते,विश्वाम्बर गिराम,यांच्या राहत्या घरात घुसून चोरी झाली तर नामदेव चव्हाण यांच्या घरी प्रयत्न झाल्याचे समजते.**

या चोरीच्या घटनेतून चोरांनी रोख रकमेसह सोन्या चांदीच्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे,गावातील अवैध धंद्यांची माहिती जसे पिंपळनेर पोलिसांना मिळते तसी माहिती या चोरांची का पोलीस काढत नाहीत असा सवाल गावकरी करत आहेत.त्यामुळे नाथापूर येथील रहिवाशी मात्र घाबरलेल्या अवस्थेत असल्याचे बोलले जात आहे.वारंवार चोर्या होऊनही आणखी एकाही चोरीच्या घटनेचा तपास लागलेला नाही,त्यामुळे पोलिसांच्या कार्यावरही प्रश्नचिन्ह तयार होताना दिसून येत आहे, तरी या चोऱ्यांचा तपास लवकरात लवकर लावण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थाकडून होताना दिसून येत आहे.



राष्ट्रीय एकतेचे पुरस्कर्ते, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक श्रद्धेय डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांना स्मृतिदिनानिमित्त जिल्हा भाजपा कार्यलय येथे लोकनेत्या मा. ना. पंकजाताई साहेब मुंडे व माजी खासदार डॉ. प्रितमताई साहेब मुंडे यांच्या मार्गदर्शना खाली बीड शहर भाजपा च्या वतीने अभिवादन करते वेळी प्रा. देविदास नागरगोजे सर, विक्रांत हजारी, नवनाथ अण्णा शिराळे, सलीम भाई जहांगीर, सुनील मिसाळ, शांतीनाथ डोरले, इर्शाद भाई, संगीताताई धसे, मनोज काका पाटील, अशोक रसाळ, संग्राम बांगर, विलास बामणे, अमोल वडतीले, बाबुलाल ढोरमारे, राजू शहाणे, सतीश कोटेचा, केशव बडे, अशोक घोलप, नरेश पवार आदी!!

# योग हा सुखी व समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे- डॉ.ज्ञानोबा दराडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशभरात मागच्या सन २०१४ पासून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. या योगदिनानिमित्त अंबाजोगाई येथेही विविध ठिकाणी हा योगदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देखील तीन दिवशीय योग शिबिराचे आयोजन केले होते.या तीन दिवसीय योग शिबिरात योग प्रशिक्षक म्हणून नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी अतिशय उत्तम अशी कामगिरी बजावली . यावेळी त्यांनी योग साधनेबाबत मार्गदर्शन करतांना स्पस्ट केले की योग हा सुखी समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे, त्यामुळे नियमितपणे सर्वांनी किमान ४५मिनिट योगसाधना करण्याचे आवाहन डॉ दराडे यांनी केले. या शिबिरात स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांच्यासह अनेक डॉक्टर उपस्थित होते.



भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने मागील ११ वर्षापासून योगदिन साजरा करण्यात येत आहे.स्वा रा तिच्या योगशिबिरात अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी देखील उपस्थित सर्वांना प्राणायाम व योगसाधनेचे महत्त्व विषद केले. त्याबरोबरच योगाचे काही प्रात्यक्षिक देखील करून दाखवले.आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून स्वा रा ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर्स, वैद्यकीय विद्यार्थी, अधिपरिचरिका तथा कर्मचारी बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय योगशिबिराच्या दरम्यान योग प्रशिक्षक डॉ ज्ञानोबा दराडे यांनी विविध प्रकारचे योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रशिक्षण दिले. तसेच योगासने केल्यामुळे शरीरातील सर्व स्नायू, हाडे ◀◀ पान ३ वर

# पाटोदा-मोटेगाव रस्त्यावरील शिवस्मारकाच्या कामाची चौकशी करा -सचिन फोलाने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाटोदा ते मोटेगाव या शिव रस्त्याचे सध्या सुरू असलेले काम हे निकृष्ट दर्जाचे होत आहे. असे पंचक्रोशीतील नागरिकांचे म्हणणे आहे. तरी या प्रकरणी सदरील रस्ता कामाची खातेनिहाय चौकशी करून या कामाचा जो कोणी संबंधित ठेकेदार असेल त्याच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व सदर कामाचे बिल मंजूर करू नये अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना शुक्रवार, दिनांक २० जुन रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पाटोदा ते मोटेगाव या मार्गावर शिव रस्त्याचे सध्या सुरू असलेले डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येत आहे. रस्त्याच्या गुणवत्तेबाबत स्थानिक नागरिकांत तीव्र नाराजी आहे. केवळ वरवरचे डांबर टाकून तांत्रिक निकष आणि मानकांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे स्पष्टपणे जाणवते. निकृष्ट सामग्रीचा वापर, अपुरे बेस तयार करणे आणि आवश्यक देखरेख व गुणवत्ता चाचणी न करणे, ही गंभीर त्रुटी या कामात आढळत आहेत. या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, व तोपर्यंत किंवा चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर कामाचे कोणतेही बिल मंजूर अथवा वितरीत करू नये, अशी नम्र विनंती आहे. यामुळे सार्वजनिक निधीची लूट थांबवता येईल व गुणवत्तापूर्ण सार्वजनिक सुविधा नागरिकांना मिळू शकतील. अशी अपेक्षा ही सदरील निवेदनातून राष्ट्रवादी युवक काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी व्यक्त केली आहे.

# वाळूची चोरटी वाहतूक करताना टिप्पर पकडला

## अंभोरा पोलिसांची कारवाई; दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील धामणगांव येथील पाथर्डी चौकात विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करण्यासाठी वाळूने भरलेला टिप्पर असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना मिळताब त्यानी रविवारी रात्रीच्या दरम्यान सापळा रचून ताब्यात घेत कारवाई केली. दहा लाख तीस हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील धामणगांव येथील पाथर्डी चौकात रविवारी रात्रीच्या दरम्यान वाळूने भरलेला टिप्पर असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना समजातच त्यांनी सापळा रचून कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करत आरोपीस अटक करून दहा लाख तीस हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, पोलीस अमलदार शिवदास केदार, बालाजी होळंबे, चालक पठाण यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे हे करीत आहेत.

# विठू नामाच्या गजरात मोठेवाडीची दिंडी पंढरीकडे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील काळा हनुमान मंदिर ते पंढरपूर या पायी दिंडीने दि २२ जुन सोमवारी विठ्ठल नामाच्या गजरात पंढरीकडे प्रस्थान केले.

हभप साध्वी वैष्णवी दिदी,हभप १००८ महामंडलेश्वर स्वामी मनिषानंद महाराज पुरी,हभप १००८ मनीष महाराज टाकळगव्हाणकर यांच्या आशीर्वादाने काळा हनुमान मंदिर वारकरी मंडळाच्या वतीने वारकरी दिंडीत सहभागी होतात. मोठेवाडी येथुन निघालेली दिंडी पात्रुड,आंबे



वडगाव,धारूर,साळेगाव,हसेगाव, कुर्डुवाडी मार्गे पंढरपुरात जाते.

दिंडीत गायनाचार्य हभप लक्ष्मण ◀◀ पान ३ वर

# अभिषेक चावला यांचा प्रकल्प अमेरिकेतून प्रकशित

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

अभिषेक चावला यांच्या ''ह्यूमन एक्टिविटी रक्ग्नेशन इन विडियोज यूजिंग डीप लर्निंग विध इनफ्लेटेड ३ डी मॉडल'' प्रकल्पाला (अमेरिकन इंस्टीट्यूट ऑफ फिजिक्स) प्रकाशन ने जगभरात प्रकाशित केले आहेत. एआयपी प्रकाशन हे संशोधन जर्नल्स, परिषदेच्या कामकाजाचा आणि सर्वत्र भौतिक शास्त्रज्ञांसाठी आवश्यक माहितीचा एक विश्वासार्ह स्रोत आहे.एआयपीची स्थापना, मुख्यालय न्यू यॉर्क शहरात आहे एआयपीमध्ये पाच सोसायट्यांचा समावेश आहे ज्यांचे एकत्रित सदस्यसंख्या ४ हजार आहे. अमेरिकन फिजिकल सोसायटी (एपीएस) ऑप्टिकल सोसायटी ऑफ अमेरिका (आता ऑप्टिका) अकॉस्टिकल सोसायटी ऑफ अमेरिका सोसायटी ऑफ रीओलॉजी अमेरिकन असोसिएशन ◀◀ पान ३ वर



# अवैधरित्या वाळुची चोरटी वाहतुक करणाऱ्याविरुध्द माजलगांव शहर पोलीसांची कारवाई

माजलगाव । प्रतिनिधी

गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव ते गढी जाणारे रोडवर साबळे हॉस्पीटल समोर दि २३ जुन मंगळवार रोजी सकाळी ५:५० वाजण्याच्या सुमारास अवैधरीत्या वाळुची चोरटी वाहतुक करत असलेला एक भारतबेंझ कंपनीचा हायवा टिप्पर क्रमांक एम.एच.-१७-बी.वाय-६८३६ किमती २५,००,०००/-रुपये तसेच त्यामध्ये अंदाजे ०५ ब्रास वाळु किमती २५,०००/- रुपये असा एकुण २५,२५,०००/- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने हायवा जप्त करुन चालक दत्ता परशुराम थावरे रा. आनंदगांव ता. माजलगांव व मुंजाबा मोतीराम थेटे रा. पवारवाडी ता. माजलगांव यांच्या विरुध्द गु.र.नं.२३०/२०२५ कलम ३०३ (२),३(५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.



सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस ◀◀ पान ३ वर

# संत मुक्ताई पालखीचे बीड शहरात जोरदार स्वागत



बीड । प्रतिनिधी

खानदेशातील मुक्ताईनगर येथून संत मुक्ताई पालखीचे बीडमध्ये आगमन झाल्यानंतर या पालखीचे बीडमध्ये जोरदार स्वागत करण्यात आले. ठीक ठिकाणी वारकऱ्यांसाठी फराळ आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. बीड शहरांमध्ये माळवेस भागात असलेल्या हनुमान मंदिरात या पालखीचा विसावा होता. या दरम्यान बीड शहरातील भाविकांनी या पालखीचे मनोभावे दर्शन घेतले.

त्यानंतर ही पालखी जुन्या पेठ बीड भागातील बालाजी मंदिरात मुक्कामास रवाना झाली. दरम्यानच्या काळात बीडमध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात या पालखीचे दर्शन घेतले. या पालखीचे जुन्या पेठ बीड भागात जोरदार स्वागत करण्यात आले.पेठ बीड भागामध्ये या पालखीचा मुक्काम आणि आज ही पालखी बीड शहरातून सकाळीच रवाना होणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संत मुक्ताई यांच्या आजोबा गोविंद पंतांच्या समाधी आहे. त्या ठिकाणी या पालखीचे मनोमिलन झाले. त्यानंतरच ही पालखी बालाजी मंदिराकडे रवाना झाली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात या पालखीचे बीड शहरवासीयांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले.

# वंजारी समाज बांधवांचा राष्ट्रीय मेळावा तेलगणा राज्यात उत्साहात संपन्न

## जिल्ह्याचे भूमिपुत्र समाज रत्न मोहन आघाव आणि माऊली शिरसाठ यांचा सन्मान!

येदुरागट्टा ( तेलंगणा )

सबंध हिंदुस्तान मध्ये असलेल्या विविध समाज बांधवांचा राष्ट्रीय वंजारी समाज मेळावा तेलंगणा राज्यातील येदुरागट्टा येथील भव्य वंजारी भवन मध्ये अत्यंत उत्साही वातावरणामध्ये रविवारी संपन्न झाला. या वंजारी समाज बांधवांच्या मेळाव्याला महाराष्ट्रातून आणि विशेषता मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर नेते कार्यकर्ते आणि ज्येष्ठ समाज बांधवांची आवर्जून उपस्थिती होती.



त्या मेळाव्यात वंजारी समाज बांधवांच्या विविध संकट प्रसंगी सातत्याने धावून जात योगदान देणारे बीड जिल्हा वंजारी सेवा संघाचे कार्यतत्पर अध्यक्ष माननीय मोहनराव आघाव आणि समाजसेवक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सीएनजी, इथेनॉल ट्रॅक्टर्स लवकरच बाजारात; नितीन गडकरींची पुण्यात मोठी घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात शेती आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात नवतंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत मोठी घोषणा केली आहे. पुण्यात आयोजित आंतरराष्ट्रीय टनेल वर्कशॉप परिषदेत बोलताना गडकरी यांनी सांगितले की, देशात लवकरच सीएनजी, इथेनॉल आणि इलेक्ट्रिकवर चालणारे ट्रॅक्टर्स उपलब्ध होतील.



मी स्वतः माझ्या शेतात सीएनजी ट्रॅक्टर वापरतो. शेतीत अशा पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. यासोबतच, देशात बोगदे निर्मिती, पर्यायी इंधन आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पायाभूत सुविधांच्या विकासावरही त्यांनी भर दिला.

गडकरी यांनी शेती क्षेत्रात पर्यायी इंधनाच्या वापरावर जोर दिला. आम्ही सीएनजी, इथेनॉल आणि इलेक्ट्रिकवर चालणारे ट्रॅक्टर्स विकसित करत आहोत. माझ्या शेतात मी स्वतः सीएनजी ट्रॅक्टर वापरतोय. यामुळे इंधन खर्च कमी होतो आणि पर्यावरणाचे रक्षण होते, असे गडकरी म्हणाले.

त्यांनी शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन केले. याशिवाय, दुचाकी वाहनांवरही सीएनजीचा वापर वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. सीएनजी दुचाकीमुळे खर्चात मोठी बचत होते. शेती आणि वाहतूक क्षेत्रात अशा तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात अपरिहार्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पायाभूत सुविधांच्या विकासावर बोलताना गडकरी यांनी बोगदा निर्मितीवर विशेष भर दिला. देशात येत्या काही वर्षांत ३ लाख कोटी रुपयांचे बोगदे बांधण्याचे नियोजन आहे. सध्या बोगदा निर्मितीच्या मशिन्स फक्त चीनमध्येच तयार होतात, पण राजकीय कारणांमुळे आपण त्या आयात करू शकत नाही.

त्यामुळे स्वदेशी मशिन्स विकसित करण्याची गरज आहे, असे गडकरी म्हणाले. बोगदा निर्मितीत कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आणि नवतंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढवण्याचेही त्यांनी आवाहन केले. आयात मशिन्स महाग आहेत. आपण स्वतःच्या मशिन्स बनवल्या तर खर्च कमी होईल आणि देशाला आत्मनिर्भर बनवता येईल, असे ते म्हणाले. पुण्यात ५० हजार कोटींचे पूल

पुणे जिल्ह्यात पायाभूत सुविधांच्या विकासावर गडकरी यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पुण्यात ५० हजार कोटी रुपयांच्या पुलांच्या निर्मितीचे काम सुरू आहे. यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे, असे त्यांनी सांगितले. टोल नाक्यांबाबतही त्यांनी मोठे विधान केले. टोल नाके आता बंद झाले आहेत. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वाहतूक अधिक गतिमान आणि पारदर्शी होत आहे, असे गडकरी म्हणाले. त्यांनी टोल कंपन्यांना कामचुकारपणा टाळण्याचा आणि पारदर्शकपणे काम करण्याचा सल्ला दिला. काही टोल कंपन्या नखरे करतात. मी ठरवलंय, अशा कॉन्ट्रॅक्टर्सना जेलमध्ये टाकेन, असा खणखणीत इशारा त्यांनी दिला.

# एक टन पिठलं आणि एक लाख भाकरीचा यवतला महाप्रसाद

**यवत । प्रतिनिधी**

यवतला वारकऱ्यांसाठी पिठलं भाकरी बनवण्याची लगबग सुरू झाली आहे. जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा सोमवारी यवत मुक्कामी येत आहे. यानिमित्ताने यवत परिसरातील घरोघरी पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी पिठलं भाकरी बनविण्यासाठी लगबग सुरू आहे.



संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम पालखी सोहळा आज सोमवार (दि.२३) सायंकाळी यवत मुक्कामी येणार आहे. पालखी श्री काळभैरवनाथ मंदिर येथे विसाव्यासाठी आल्यानंतर यवत ग्रामस्थांच्या वतीने ग्रामीण भागातील वारकऱ्यांसाठी पिठलं भाकरीच्या महाप्रसादाचे वाटप केले जाते. यावेळी श्री काळभैरवनाथ मंदिर येथे जवळपास एक हजार किलोपेक्षा अधिक पिठलं तयार करण्यासाठी आज सकाळपासूनच लगबग सुरू झाली आहे.गावातील प्रत्येक रहिवासी आपल्या परीने पाच - दहा भाकरी पासून १०० भाकरी मंदिरात आणून देतात. तर श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने मंदिर परिसरात ३०० किलो पिठाच्या भाकरी बनविण्यात येत असतात.


गावातील प्रत्येक नागरिकांच्या घरी देखील भाकरी बनवून पालखी येण्यापूर्वी मंदिरात देण्यात येतात .जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे श्री काळभैरवनाथ मंदिर येथे आगमन व महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाते.

यवत येथील प्रसिद्ध पिठलं भाकरीचा आस्वाद घेण्यासाठी पोलीस प्रशासन, सरकारी अधिकारी व कर्मचारी यांसह नागरिकांमध्ये आतुरता असते. परंपरेनुसार या ठिकाणी यवत ग्रामस्थ मोठ्या भक्ती भावाने आणि प्रेमाने पिठलं भाकरी बनविण्यासाठी आणि महाप्रसाद वाटप करण्यासाठी तयारी करतात.

# पुणे रेल्वे स्टेशनला थोरल्या बाजीराव पेशव्यांचं नाव द्या; खासदार मेधा कुलकर्णींची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्टेशनच्या नामांतराची आता चर्चा सुरु झाली आहे. त्यातच स्टेशनला कोणाचं नाव द्यायचं? त्यावरुन आता वाद निर्माण झाला आहे. यासाठी चार विविध नावं यासाठी पुढे आली असून विविध राजकीय गटांकडून ही नावं पुढं आणण्यात आली आहेत. यामध्ये पुण्यातील राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी यासाठी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचं नाव सुचवलं आहे. तर स्टेशनला महात्मा ज्योतिबा फुले यांचं नाव देण्याची मागणी संभाजी ब्रिगेडनं केली आहे.




मेधा कुलकर्णी यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना म्हटलं की, पुणे स्टेशनला श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचं नाव देण्यात यावं, अशा प्रकारची मागणी पुण्यातल्या अनेक संघटनांनी वेळोवेळी केलेली आहे. मी सुद्धा याचा पुनरुच्चार आजच्या मिटिंगमध्ये केला. पुण्यातील सांस्कृतीक इतिहासाच्या ज्या काही पाऊलखुणा आहेत, त्या पुणे रेल्वे स्टेशनवर दिसल्या पाहिजेत. अशी मागणी मी केलेली आहे. पुणे स्टेशनचं नुतनीकरण होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर मी ही मागणी केलेली आहे.

तर संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष संतोष शिंदे यांनी म्हटलं की, आज शिक्षणाची ओळख म्हणून तसंच विद्येचं माहेरघर म्हणून पुण्याची ओळख केवळ महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर आणि जगभर आहे. ही ओळख केवळ महात्मा फुलेंच्या शैक्षणिक चळवळीमुळं झाली. आम्हाला परत आधुनिक पेशवाई नको आहे, त्यामुळं पुणे स्टेशनला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांचंच नाव दिलं गेलं पाहिजे. यासंदर्भात आम्ही लवकरच बैठक घेऊन आणि पुन्हा एकदा हा लढा लढण्याचं काम करु. पण पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा फुलेंचंच नाव दिलं गेलं पाहिजे

त्याचबरोबर रिपब्लिकन पक्षाचे नेते सचिन खरात यांनी देखील या वादात उडी घेतली आहे. त्यांनी म्हटलं की, मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्टेशनला थोरले बाजीराव पेशव्यांचं नाव देण्याची मागणी केल्याचं समजत आहे. पेशव्यांच्या काळात पेशव्यांनी हीच 'राज्यभिषेक शक' बंद करुन 'फसली शक' निर्माण केली. आमची स्पष्ट मागणी आहे की पुण्याच्या रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशव्यांचं नाव देऊ नये. पुण्याच्या रेल्वे स्थानकाला क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचंच नाव देण्यात यावं

तर आणखी चौथं नावही पुणे स्टेशनला देण्याची मागणी करण्यात आली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी पुणे रेल्वे स्टेशनला गोपाळ कृष्ण गोखले किंवा महात्मा फुले यांचं नाव देण्याची मागणी केली आहे. त्यांनी म्हटलं की, पुणे स्टेशनचं नाव बदलू नये अशी आमची भूमिका आहे. पण द्यायचंच असेल नवा तर महात्मा ज्योतिबा फुले रेल्वे स्टेशन किंवा नामदार गोपाळकृष्ण गोखले रेल्वे स्टेशन असं नाव देण्यात यावं. यांनी देखील या शहरासाठी आणि त्यांच्या क्षेत्रात केलेलं काम हे निश्चितच दखल घेण्यासारखं आहे.

# कामगाराचा मृतदेह कंपनीच्या गेटसमोर ठेवत आंदोलन; शिक्रापूर येथील प्रकार

**तळेगाव ढमढेरे । प्रतिनिधी**

शिक्रापूर (ता. शिरूर) येथील ट्रिनिटी इंडिया फोर्जटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमधील कामगाराला त्रास झाल्यानतर कंपनी प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे रामपाल सताई दुशद या कामगाराचा मृत्यू झाला.

त्यामुळे अन्य कामगार व नातेवाईकांनी रविवारी (दि. २२) सकाळच्या सुमारास मृत कामगाराचा मृतदेह कंपनीच्या गेटवर ठेवत कंपनी प्रशासनाचा निषेध व्यक्त करत आंदोलन केले. अखेर पोलिसांच्या मध्यस्थीने मृतदेह अंत्यविधीसाठी नेण्यात आला. शिक्रापूर येथील ट्रिनिटी इंडिया फोर्जटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये रामपाल दुशद हा कायमस्वरूपी कामगार आहे. सोमवारी (दि. १६) कामावर असताना दुशद याची प्रकृती खालावली. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यासाठी कंपनीकडे रुग्णवाहिका नसल्याने त्याला रुग्णालयात नेण्यासाठी एक



तास उशीर झाला.

परिणामी रामपालची प्रकृती गंभीर झाली. त्याला उपचारासाठी वाघोली येथे हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान अखेर शनिवारी (दि. २१) रात्रीच्या सुमारास रामपालचा मृत्यू झाल्याने अन्य कामगार व नातेवाईक संतप्त झाले. त्यामुळे रविवारी (दि. २२) सकाळच्या सुमारास कामगार व नातेवाईकांनी रामपालचा मृतदेह कंपनीच्या गेटवर ठेवत कंपनी प्रशासनाचा निषेध व्यक्त करत आंदोलन केले.

दरम्यान कंपनीच्या गेटवर घोषणाबाजी सुरू होताच सहायक पोलिस निरीक्षक राहुल देशमुख, पोलिस हवालदार संदीप कारंडे, दामोदर होळकर, महिला पोलिस कर्मचारी पल्लवी वाघोले यांनी घटनास्थळी भेट देत कामगार व नातेवाईकांशी चर्चा करत घटनेबाबत तक्रार द्या, आम्ही कारवाई करू असे आश्वासन दिले. त्यानंतर अखेर पोलिसांच्या मध्यस्तीने मृत कामगारावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी कामगारांनी कंपनी प्रशासनाबाबत नाराजी व्यक्त केली. दुसरीकडे कंपनी प्रशासनाच्या जबाबदार अधिकार्यांनी एकमेकाकडे बोट दाखवत बोलणे देखील टाळले. भाजपाचे तालुकाध्यक्ष जयेश शिंदे व क्रांतिवीर प्रतिष्ठान सणसवाडीचे अध्यक्ष सागर दरेकर यांनी कंपनीमध्ये भेट देत कंपनीमध्ये ४०० कामगार असताना एकही रुग्णवाहिका नसल्याने नाराजी व्यक्त करत कंपनी प्रशासनावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल न झाल्यास आम्ही आक्रमक पवित्रा घेणार असल्याचे सांगितले.

कंपनीने पोलिसांना माहिती देणे टाळले

शिक्रापूर येथील ट्रिनिटी इंडिया फोर्जटेक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये कामगार व नातेवाईकांनी कंपनीच्या गेटवत मृतदेह आणून ठेवत आंदोलन सुरू केले तरीही तासभर कंपनी प्रशासनाने चक्क पोलिसांना माहिती देणे देखील टाळल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

# पालखी सोहळ्या दरम्यान ड्रोन उडवणाऱ्यांवर कारवाई, पुणे पोलिसांनी केला अँटी ड्रोन गनचा वापर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण पोलिसांनी पालखी सोहळ्या दरम्यान आकाशात उडणाऱ्या ड्रोनवर कारवाई केली आहे. पालखी सोहळ्या दरम्यान ड्रोन वापरण्यास बंदी केली असूनसुद्धा अनेकांकडून ड्रोनचा सर्रास वापर होताना दिसत आहे. अशातच आता पुणे ग्रामीण पोलिसांनी अँटी ड्रोन गन चा वापर करुन ड्रोन खाली उतरवले. ड्रोन उडणाऱ्या तरुणांवर सुद्धा आता ग्रामीण पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.



संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीने काल दिवे घाट लीलयापार केला. हेच विहंगम दृश्य टिपण्यासाठी आणि त्याच्या रील्स करण्यासाठी अनेक तरुणांनी ड्रोनचा वापर केला होता. मात्र ग्रामीण पोलिसांकडे २ अँटी ड्रोन गन आहेत, त्याचाच वापर करत पोलिसांनी ही कारवाई केली आहे. संत तुकाराम महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी माध्यमांची संवाद साधत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून काही अंतरावर ड्रोन पडल्याची घटना घडली होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ड्रोन उडवणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश काढले होते.

# नांदेड सिटी वारी समितीची सामाजिक जाणिवेतून पायीवारी; हुंडाबळीविरोधात जनजागृती




**पुणे । प्रतिनिधी**

नांदेड सिटी वारी समिती आयोजित पुणे ते सासवड पायीवारी यंदा ११व्या वर्षात पदार्पण करत यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी नांदेड सिटी परिसरातून तब्बल ३०० माउलींनी या पायीवारीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यासोबत पुणे ते सासवड हे अंतर चालत पार करताना नांदेड सिटी वारी समितीचे सदस्य संजीव विजामवार, राहुल सोमवंशी, मनोज नंदे, अविनाश लगड, किरण भणगे, निलेश हगवणे, भालचंद्र कडू, सचिन रसाळ, राम बेंद्रे यांनी नियोजनाची जबाबदारी पार पाडली.

या वारीचा विशेष उल्लेख म्हणजे अविनाश लगड युथ फाउंडेशनच्या संकल्पनेतून हुंडाबळीविरोधात सामाजिक जनजागृती करण्यात आली. हुंडाबळी टाळा, समाज वाचवा अशा आशयाचे फलक घेऊन वारकऱ्यांनी समाजप्रबोधनाचा संदेश दिला. पायीवारीत अध्यात्मासोबतच सामाजिक बांधिलकीची जाणीवही जपली गेली. वारी दरम्यान आरती, अभंगवाणी आणि नामस्मरणाचे कार्यक्रम पार पडले. पुण्यातून रवाना झालेला पालखी सोहळा रविवारी रात्री सासवड मुक्कामी पोहोचला.

# दगडाचे ढिगारे टाकून वरंधा रस्ता बंद

**पुणे । प्रतिनिधी**

भोर-महाड मार्गावरील वरंधा घाट रस्ता पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठीच्या उपाययोजना करण्यासाठी, सुरक्षिततेच्या कारणामुळे तसेच भोर हद्दीत रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने पुणे प्रशासनाच्या आदेशानुसार ३० सप्टेंबरपर्यंत घाट जड वाहनांना, तर रेड व ऑरेंज अलर्ट काळात हलक्या वाहनांना बंद केला आहे. परंतु या आदेशाचे पालन न करता या मार्गावरून वाहतूक सुरू राहत असल्याने रायगड प्रशासनाकडून शुक्रवारी (ता. २०) दुपारी भोर-महाड रस्त्यावरील रायगड हद्दीत दगड मातीचे ढिगारे टाकून रस्ता बंद केला आहे. मात्र, यामुळे अडकून फसगत झालेल्या



वाहनचालकांकडून दगड, माती बाजूला करून चारचाकी वाहनांपुरता मार्ग तयार केला व तात्पुरत्या स्वरूपात हलकी वाहने सायंकाळपर्यंत सुरू होती. अचानक दगडींचे ढिगारे टाकल्याचे कळताच नागरिकांकडून नाराजीचे सूर दिसून आले. वरंधा घाट सर्वच वाहनास बंद केल्यास हिर्डोशी परिसरातील देवघर, वेणुपुरी कोंढरी, हिर्डोशी, वारवंड, कारुंगण, शिरगाव, शिळींब, आशिंपी, उंबर्डे, दुर्गाडी, अभेपुरी, चौधरीवाडी या गावातील नागरिकांची प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे. मुळातच या मार्गावरील एकमेव शिळींब मुक्कामी एसटी सोडली तर कोणतीही एसटी सुरू नाही. त्यामुळे गेले वर्षभर किंबहुना गेले अनेक वर्षांपासून या भागातील नागरिक या मार्गावरून जाणाऱ्या खासगी वाहनांनी प्रवास करत आहेत. परंतु आता रस्त्यावर दगडी टाकून घाट बंद केल्याने या भागातील नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे. त्यामुळे हलक्या वाहनांसाठी घाट कायमस्वरूपी बंद करू नये, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# बापाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार; लोणावळ्याजवळील संतापजनक घटना

**लोणावळा । प्रतिनिधी**

बाप लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी आणि हृदय पिळवटून टाकणारी एक घटना समोर आली आहे. मावळ तालुक्यातील लोणावळा शहराजवळील एका गावात जन्मदात्या पित्यानेच आपल्या १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी असलेल्या आरोपीची पत्नी तथा पीडितेची आई यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २० जून २०२५ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही अमानुष घटना घडली. कुसगाव बुद्रुक गाव हद्दीत राहत्या घरात पीडित मुलगी एकटी असताना तिच्या पित्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.

आरोपीला आपली मुलगी अल्पवयीन असल्याची पूर्ण कल्पना होती, तरीही त्याने दोन वेळा तिच्यावर अत्याचार केला. ही किळसवाणी घटना कोणालाही न सांगण्यासाठी त्याने मुलीला मारण्याची धमकीही दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास म.स.पो.नि. विजया म्हेत्रे करीत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# शहरातून, गावातून ऑलिम्पिकवीर तयार झाले पाहिजे : क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

**पुणे । प्रतिनिधी**

प्रत्येक शहरातून, गावातून जास्तीतजास्त ऑलिम्पिकवीर तयार झाले पाहिजे, आगामी २०२८, २०३२ मधील ऑलिम्पिकमध्ये भारताला जास्तीत जास्त पदके मिळतील व या यशात महाराष्ट्राचा मोठा वाटा असेल असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुण्यातील ऑलिम्पिक दिनाच्या समारंभात केले. राज्यात ऑलिम्पिक दौड, खेळाडूंचा गौरव व क्रीडा प्रात्यक्षिकांने क्रीडामय वातावरणात ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना, क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि सर परशुराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने -आयोजित ऑलिम्पिक दिन समारंभात ऑलिम्पिकपटू व अर्जून पुरस्कार खेळाडूंना गौरव करण्यात आला. क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ऑलिम्पिकपटू रेखा भिडे, मनोज पिंगळे, अर्जून पुरस्कार प्राप्त शंकुतला खटावकर, श्रीरंग ईनामदार, शांताराम जाधव, प्रदिप गंधे, स्मिता



यादव, ऑलिम्पिक पत्रकार संजय दुधाणे, युवा खेळाडू गायत्री शिंदे, गाथा खडके यांचा शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आले. या प्रसंगी क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले, सहसचांलक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी, सुहास पाटील, युवराज नाईक, सर परशुराम महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुनील गायकवाड, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिंरगांवकर, जिल्हा क्रीडाधिकारी जगन्नाथ लकडे, धनंजय भोसले आदी उपस्थित होते.

ऑलिम्पिक दिनानिमित्त सकाळी ८ वाजता ऑलिम्पिक दौड काढण्यात आली. ऐतिहासिक लाल महाल येथे क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून दौड सुरू करण्यात आली. दौडीस शालेय विदयार्थ्यांना मोठा प्रतिसाद लाभला. सायकलिंग व स्केटिंगपटूंही दौडीत सहभागी झाले होते. एनसीसीच्या शालेय बँन्ड पथकाच्या निनादात क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दौडीचे स्वागत केले. शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर लेडी रमाबाई सभागृहामध्ये ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मुख्य समारंभ रंगला. मल्लखांब, योगा, जिम्नॅस्टिक, तायक्कांदो, किकबॉक्सिंग, स्केटिंग ड्रान्स व मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिकांनी उपस्थितींची मने जिंकली.

खेळाडूंच्या गौरव समारंभानंतर राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांची मनोगते झाली. खेळाडुंना पाठबळ देण्यासाठी राज्य सरकारने चांगले निर्णय घेतले आहे. क्रीडाखात्याने १४९ जणांना शासकीय नोकरी दिली आहे असे सांगून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय (मामा) भरणे पुढे म्हणाले की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या खेळाडुंनी पदके जिंकण्यासाठी राज्याचा क्रीडामंत्री म्हणून मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव शिंरगांवकर यांनी केले तर आभार प्रदिप गंधे यांनी मानले.

# शिरूर पोलिसांची कमाल ! चोरीची मोटारसायकल परजिल्ह्यातून जप्त, सराईत चोरटा गजाआड

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर शहरातील मार्केटयार्ड परिसरातून चोरीस गेलेली मोटारसायकल अवघ्या काही दिवसांत परजिल्ह्यातून हस्तगत करत शिरूर पोलिसांनी दाखवलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. या शिताफीच्या कारवाईत सराईत चोरटा बापू गजानन थोरात (वय ३५, रा. बोळेगाव, ता. व जि. अहमदनगर) याला नागपूर एमआयडीसी परिसरातून अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीची होंडा शाईन मोटारसायकल (क्र. चक१३ इक्ष ६९२७) जप्त करण्यात आली आहे.

२८ मे २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२:३० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीने आपली होंडा शाईन मोटारसायकल मार्केटयार्ड परिसरातील मोकळ्या जागेत हँडल लॉक करून पार्क केली होती. मात्र, अज्ञात चोरट्याने ही मोटारसायकल चोरून नेली. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३६६/२०२५, भा.द.वि. कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल झाला.

असा केला पोलिसांनी तपास

मोटारसायकल चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी शिरूर पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी विशेष तपास पथक स्थापन केले. पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शहरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत आरोपीचा माग काढला. तपासात बापू थोरात हा सराईत चोरटा असल्याचे उघड झाले. त्याच्याविरुद्ध पुणे ग्रामीण, पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि अहमदनगर येथे मोटारसायकल चोरीचे एकूण ९ गुन्हे दाखल आहेत.